Archives Section
19
(d)



# माझी पायपीट

शांताबाई परांजपे



शांताबाई परांजपे

# माझी पायपीट

शांताबाई परांजपे

१९९३
महर्षी कर्वे स्त्री-शिक्षण संस्था
(हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था)
पुणे-५२

आभार :
वरील चित्र
श्री. मनोहर जोशी,
मुंबई
●
लेखिका :
**श्रीमती शांताबाई परांजपे**
बलवंतनगर सोसायटी,
इमारत क्र. १६, खोली क्र. ३,
सोडावाला लेन, बोरिवली पश्चिम,
मुंबई ४०० ०९२.
●
पहिली आवृत्ती १९८०
दुसरी आवृत्ती १९८२
तिसरी आवृत्ती १९९३
●
प्रकाशक :
**वा. भा जोशी**
सचिव,
महर्षी कर्वे स्त्री-शिक्षण संस्था,
(हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था),
कर्वेनगर, पुण ४११ ०५२
●
© महर्षी कर्वे स्त्री-शिक्षण संस्था,
(हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था)
●
**किंमत : १० रुपये**
●
मुद्रक :
महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय
'आर्यभूषण भवन', ९१५/२ शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४

# तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

श्रीमती शांताबाई परांजपे यांच्या 'पायपीट' ह्या पुस्तकाची **तिसरी आवृत्ती** काढताना संस्थेला आनंद होत आहे. संस्थेला सेवाभावी-वृत्तीने मदत करणाऱ्या माजी विद्यार्थिनींपैकी शांताबाई ह्या ज्येष्ठ व श्रेष्ठ स्वयंसेविका आहेत.

संस्थेच्या सध्याच्या सर्व विद्यार्थिनींनी ह्या पुस्तकाची प्रत जवळ बाळगल्यास पुढील जीवनात त्यांना याचे दीपस्तंभासारखे मार्गदर्शन होईल आणि संस्थेचे कसे उतराई व्हावे याचे मार्गदर्शन होईल. इतकेच नव्हे तर ही पुस्तिका अन्य समाजसेविकांनाही मार्गदर्शक व्हावी अशीच आहे.

शांताबाई यांनी गेली अनेक वर्षे सातत्याने भाऊबीज जमविण्यासाठी जीवापाड कष्ट घेतले असून २० डिसेंबर ९२ अखेर सुमारे १५ लाख. निधी जमविला

संस्थेच्या मदतीमुळेच मी मानाचे जीवन जगू शकते ही त्यांची भावना असून संस्थेच्या ऋणातून मुक्त व्हावे म्हणून त्यांनी ही भाऊबीज निधी जमविण्यास सुरुवात केली पण आता त्यांचे संस्थेने कसे उतराई व्हावे हेच कळत नाही. 'भाऊबीज' ह्या कल्पनेमागे एक कौटुंबिक प्रेमाची भावना असून ही स्वखुषीने समाजाने दिलेली मदत असते.

आता शांताबाई घरोघर जाऊ शकत नाहीत पण त्या पत्ररुपाने अनेक दात्यांना भेटतात व आपले काम अखंड चालूच ठेवतात. त्या सध्या ८० वर्षांच्या असल्या तरीही त्यांचा उत्साह दांडगा आहे. त्यांना शरीर-प्रकृती तेवढी साथ देत नाही. पण याचा शांताबाईंच्या या कार्यावर तसा मात्र परिणाम झालेला नाही.

**वा. भा. जोशी**
सचिव

**सौ. कुंदा नेने**
कार्याध्यक्ष
भाऊबीज भेट मंडळ

कै. गो. म. तथा बापूसाहेब चिपळूणकर



भाऊबीज निधीचे जनक

१, रुपाली,

पुणे ४

"समाजपुरुषाचे सहस्रावधी हात लागल्याशिवाय सामाजिक प्रगतीचे कुठल्याही प्रकारचे कार्य खऱ्या अर्थाने सामाजिक होत नाही. हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेची भाऊबीज योजना समाजातल्या जास्तीत जास्त लोकांना ह्या कार्याशी आपले नाते जोडण्याची संधी देणारा उपक्रम आहे. "भाऊबीज" ह्या कल्पनेमागे एक कौटुंबिक आपुलकीची भावना आहे, त्यामुळे ह्या प्रसंगी दिलेली आर्थिक देणगी दान ही न होता मंगलप्रसंगी दिलेला आहेर होतो आणि देणारी आणि घेणारी व्यक्ती ह्यांच्यात उच्चनीच स्तर उत्पन्न होत नाहीत. आप्त भावना महत्त्वाची ठरते

गेली ७० वर्षे हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेने हा उपक्रम चालविला आहे. स्त्री-शिक्षणासारख्या एका महान कार्याशी आपले भावनात्मक नाते जुळवण्याची ही एक, स्वत:लाच धन्यता वाटायला लावण्याची संधी आहे, असे मी मानतो आणि म्हणूनच यंदाही अनेक अज्ञात भावांनी ह्या भगिनींची भाऊबीज साजरी करावी असे मला वाटते."

पु. ल. देशपांडे

# भाऊबीज भेट

हिंगण्याच्या अनाथबालिकाश्रमाला पैशाची मदत मिळावी म्हणून श्री. काशिनाथ रघुनाथ मित्र यांनी भाऊबीजेची ओवाळणी ह्या रुपाने मासिक मनोरंजनाच्या वर्गणीदारांकडून मदत मिळवून तो आश्रमाकडे पाठविल्याचा उल्लेख संस्थेच्या १९०२ सालच्या अहवालात आहे. कै. गोपाळ महादेव ऊर्फ बापूसाहेब चिपळूणकर यांनी दिवाळीच्या सुट्टीत स्वयंसेवकांमार्फत भाऊबीज भेट मिळविण्याची कल्पना १९१९ साली काढली पहिल्या वर्षी रु. १,७७९ भाऊबीज जमली. हा आकडा वाढत वाढत १९७९ साली रु. १,०७,९२८ पर्यंत गेला. एकसष्ट वर्षांत या भाऊबीज निधीचे एकूण रु. १२,११,८७८ संस्थेला मिळाले. या रकमेत एकट्या श्रीमती शांताबाई परांजपे यांचेच २५ टक्के म्हणजे रु. ३,१७,५८६ आहेत. सालोसाल एकूण निधीचा व शांताबाईंच्या भाऊबीजेचा उच्चांक चढतच चालला आहे. गेल्या वर्षी तर त्यांची रक्कम एक-तृतीयांश म्हणजे रु. ३२,०७१ होती. वयाच्या सदुसष्टाव्या वर्षात शारीरिक प्रकृती प्रतिकूल असताना त्यांची ही कर्तबगारी थक्क करून सोडणारी आहे. त्यांनी घेतलेल्या परिश्रमांना संस्थेच्या इतिहासात तोड नाही संस्था त्यांच्या ऋणातून कधीच मुक्त होणार नाही.

पहिले एक लाख पुरे झाल्यावर श्रीमती लीलाबाई बावडेकर यांनी त्यांची एक मुलाखत घेतली होती. ती 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये प्रसिद्ध झाली होती. नंतर दोन लाख पुरे झाले त्यावेळी व गेल्या वर्षी तीन लाख पुरे झाले तेव्हा वर्तमानपत्रात त्यांच्याबद्दल गौरवपर मजकूर आला तो पुढे दिला आहे.

दरवर्षी भाऊबीज निधी चिपळूणकरांच्या पुण्यतिथीच्या दिवशी २० डिसेंबरला संस्थेला समर्पण करण्याचा समारंभ होतो. त्यावेळी शांताबाई आपले कडू-गोड अनुभव सांगत असतात. त्यांचे हे कथन इतरांना स्फूर्ती देणारे व मनोरंजकही असते. म्हणून ते लिहून काढण्याची त्यांना विनंती केली. त्याप्रमाणे त्यांचे लिखाण त्यांनी स्वत: दिलेल्या समर्पक नावाने—माझी पायपीट—या पुस्तिकेत प्रसिद्ध करण्यास संस्थेला फार आनंद वाटतो.

२० डिसेंबर १९८०

**शकुंतला लिमये**
कार्याध्यक्षा
भाऊबीज भेट मंडळ

**लीला शंकर देशमुख**
चिटणीस
हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था

ही पुस्तिका अनेकांना फार आवडल्याचे त्यांनी कळविले व छापलेल्या सर्व प्रती संपून गेल्या. श्रीमती शांताबाईंकडूनच कित्येकांनी प्रती विकत घेतल्या. त्यांच्याकडून चारपाचशे प्रती खपल्या. अनेक वर्तमानपत्रांत चांगले अभिप्राय आले. धर्मयुगमध्ये शांताबाईंचा स्वतःचा लेख प्रसिद्ध झाला. त्यामुळे त्यांच्या कामाचा प्रसार भरपूर झाला. माननीय यशवंतराव चव्हाण यांच्यापर्यंत पायपीटची एक प्रत पोचली. त्यांनी अभिनंदनपूर्वक लिहिले– ' निष्ठेने काम करणाऱ्या एका थोर महिलेने परिश्रमपूर्वक केलेल्या कामाचे दर्शन होते. '

आकाशवाणीवर शांताबाईंची मुलाखत झाली. तशीच दूरदर्शनवरही प्रसारित झाली. त्यामुळे सर्वदूर त्यांच्या कार्याला प्रसिद्धी मिळाली. शांताबाई राहतात त्या गोविंदनगर ( बलवंतनगर ) सोसायटीमध्ये गणपती उत्सवात त्यांचा सत्कार झाला. १४ ऑक्टोबर १९८१ रोजी बॉम्बे वेस्ट रोटरी क्लबने मोठा गौरव केला. ७ फेब्रुवारी १९८२ रोजी बालमोहन विद्यामंदिरात हुंडाविरोधी चळवळ, मुंबई यांच्यातर्फे शांताबाईंचा गौरव झाला.

११ मार्च १९८२ रोजी बलवंत बुक स्टॉलने लेखकांचा सत्कार केला त्यात शांताबाईंचा प्रथम क्रमांक होता. १४ मार्च १९८२ ला डोंबिवलीचे श्री. शरद जोशी यांनी आपल्या घरी अनेक मित्रमंडळीना बोलावून शांताबाईंचा सत्कार केला व भाऊबीज जमविली. अशा रितीने शांताबाईंच्या थोर कार्याची पावती समाजाकडून मिळाली आहे. प्रत्येक ठिकाणी त्यांना कमीजास्त भाऊबीजही मिळाली.

मागील पानावर १९७९ पर्यंतचे आकडे दिले आहेत. गेल्या दोन वर्षांत एकंदर भाऊबीज रु. १,२६,७६३ व रु. १,६६,१३९ अशी जमली. तीत शांताबाईंची रक्कम रु. ३४,३०७ व रु. ४७,४९८ म्हणजे आजतागायत एकूण जमलेल्या पंधरा लाखांपैकी जवळ जवळ चार लाख म्हणजे साडेसव्वीस टक्के झाली. आता शांताबाईंनी सत्तरी गाठली आहे तेव्हा फार परिश्रम घेऊ नयेत असे वाटते. पण त्यांचा उत्साह दांडगा आहे. तो मन थक्क करून सोडणारा आहे.


पायपिटीची ही दुसरी आवृत्ती इतक्या लवकर प्रसिद्ध करण्यास संस्थेला धन्यता वाटते.

२० डिसेंबर १९८२

**शकुंतला लिमये**
कार्याध्यक्षा
भाऊबीज भेट मंडळ

**वा. भा. जोशी**
चिटणीस
हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था

## शांताबाई परांजपे ह्यांनी पायपीट करून संस्थेसाठी जमविलेल्या भाऊबीजेचा आलेख १९८२-१९९२



# श्रीमती शांताबाई परांजपे

## परिचय

पुढे दिलेल्या मुलाखतीत शांताबाईंचा जीवनपट थोडासा आलेलाच आहे. येथे तो थोडक्यात दिला आहे. त्यांचा जन्म कोकणातल्या गरीब ब्राह्मण कुटुंबात १०–९–१९१३ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातल्या निवे खुर्द या लहानशा गावी झाला. सातव्या वर्षी लग्न झाले पण महिन्याच्या आतच वैधव्य आले, म्हाताऱ्या आजीची सेवा करीत त्यांनी दिवस काढले. आजी गेल्यानंतर १९२८ साली त्या संस्थेत ( त्यावेळी अनाथ बालिकाश्रम ) दाखल झाल्या. प्रथम स्वयंपाकघरात काम करून त्यांनी प्राथमिक शिक्षण पुरे केले व पुढे प्राथमिक शिक्षक प्रमाणपत्र मिळविले. संस्थेत त्यांनी खूप कष्ट काढले. किरकोळ खर्चाला देखील जवळ पैसा नव्हता. एकदा तर चोरीचा आळ आला तेव्हा १९३६ साली आतेबहिणीने पाच रुपये मनिऑर्डरने पाठविले. १९३८ साली अखेरच्या परीक्षेचा फॉर्म भरण्यासाठी पैसे नव्हते तेव्हा केतकरांकडून मागविले.

प्रशिक्षण पुरे झाल्यानंतर १९३९ पासून शांताबाई प्रथम ठाणे जिल्ह्यात व १९४५ नंतर मुंबई महानगरपालिकेत शिक्षिकेचे काम करीत होत्या. १९७१ मध्ये २६ वर्षांच्या नोकरीनंतर त्या सेवानिवृत्त झाल्या तोपर्यंत त्या नालासोपारा येथे राहात होत्या. आता बोरिवलीला बलवंत-नगरमध्ये स्वतःच्या खोल्यांत राहात आहेत.

संस्थेत असल्यापासून त्या भाऊबीज भेट मिळविण्याचे काम करू लागल्या होत्या व पुढे नोकरी लागल्यानंतर त्यांनी ते पुढे सतत चालू ठेवले. निराशाग्रस्त जीवनातून स्वतःच्या पायावर उभे राहण्याची जी संधी संस्थेने दिली त्याबद्दलची कृतज्ञता त्यांनी अशा तऱ्हेने सक्रिय पुरी व्यक्त केली व संस्थेचे ऋण फेडले. या कामात त्यांची धाकटी बहीण श्रीमती आऊताई गोडबोले ( विधवा होऊन शांताबाईंकडेच राहायला आलेली ) हिने, १९६९ साली कॅन्सरने निधन होईपर्यंत सतत साथ दिली.

दर वर्षी ऑगस्ट ते डिसेंबर चर्नीरोडपर्यंतचा रेल्वेचा पास काढून शांताबाई आपले शिक्षिकेचे काम सांभाळून सकाळ-संध्याकाळ हिंडत व भाऊबीज जमवीत. ही त्यांची भ्रमंती सकाळी ६ वाजल्यापासून संध्याकाळी ७ पर्यंत चाले. सेवानिवृत्तीनंतर सकाळपासून संध्याकाळपर्यंत हेच काम. हिंडण्या-फिरण्याची ताकद आहे तोपर्यंत काम करीत राहण्याचा त्यांचा निर्धार आहे. पण त्यांनी आता प्रकृती सांभाळावी व वयाकडे लक्ष देऊन धडपड कमी करावी असे सर्वांचे सांगणे आहे.

१९-११-१९६५ रोजी आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे त्यांचा सत्कार झाला व महिला-गौरव पुस्तिकेत त्यांची माहिती प्रसिद्ध करण्यात आली. बोरिवली येथील जागृत महिला मंडळानेही त्यांचा सत्कार करून थोडा हातभार लावला. शांताबाईंचे अभिनंदन व कौतुक करणारी कितीतरी व्यक्तींची आलेली पत्रे त्यांच्या संग्रही आहेत. धन्य त्यांच्या चिकाटीची व जिद्दीच्या कार्याची!

* ★ ★

दरवर्षी आधीच्या वर्षांची २०-२५ पुस्तके त्यांच्याकडे शिल्लक असतात त्यामुळे कुठेही जाता-येता वर्षाच्या सुरुवातीपासूनही भाऊबीज मिळवीतच असतात. जुलैलाच त्यांच्याकडे भाऊबीज पावती-पुस्तकांचे भले मोठे पार्सल रवाना होते व जमेल तशी हळूहळू पायपिटीला सुरुवात होते. ज्या घरी नकार मिळतो त्याची नोंदच होत नाही. पैसे मिळतात त्यांच्या पावत्या फाडल्या जातात.

अशा पाच-सहा हजार लोकांना त्या भेटतात, समक्ष जाऊन! म्हणजे ४० वर्षांत त्यांची पायपिटी किती झाली असेल त्याची कल्पनाच करवत नाही. त्याचीच ही कहाणी!

# मुलाखत*

## लीला बावडेकर यांनी घेतलेली

कोणत्याही निधीसाठी पैसा गोळा करणे, एखाद्या कार्यक्रमाची तिकिटे खपविणे किंवा एखाद्या स्मरणिकेसाठी जाहिराती मिळविणे हे काम मला कधीच जमत नाही. त्यामुळे अशा कामात तरबेज असणा-या व्यक्तींकडे मी नेहमीच आदरमिश्रित कुतूहलाने पाहात आले आहे. म्हणूनच मला जेव्हा कळलं की मुंबईत श्रीमती शांताबाई परांजपे यांनी हिंगण्याच्या भाऊबीज निधीसाठी एक लाख रुपये गोळा करण्याचा आपला संकल्प जवळ जवळ पुरा करीत आणलाय तेव्हा त्यांची भेट तरी घ्यावी म्हणून पत्ता हुडकीत निघाले.

बाईंची भेट सहजगत्या झाली आणि थोडेही आढेवेढे न घेता त्या माझ्याशी बोलू लागल्या.

"काय हो हिंगण्यासाठी एक लाख रुपये गोळा करावेत ही स्फूर्ती तुम्हाला कशी झाली?"

"अहो स्फूर्ती कशाची आलीय? आमचे स्फूर्तिस्थान म्हणजे अण्णा (अण्णासाहेब कर्वे), वयाच्या सातव्या वर्षी माझं लग्न झालं तेव्हा माझे पती होते पंचविशीचे. महिन्याभरातच देवी येऊन ते वारले. आईवडील तर मी लहान असतानाच वारले होते. तेव्हा माझ्या बहिणीच्या व माझ्या संगोपनाची जबाबदारी आमच्या वृद्ध आजीने उचलली. माझी धाकटी बहीणही बालविधवाच होती. आम्ही देवरुख जवळच्या निवे गावी रहात होतो.

"आमचे नातेवाईक श्री. वामनराव जोशी हे अण्णांचे मेहुणे. त्यांनी मला परोपरीनं सांगितले की तुला मी हिंगण्याला नेऊन सोडतो. तिथं तू स्वतःचं शिक्षण कर. तुझं सारं व्यवस्थित होईल. पण मी म्हणे, माझी आजी आता म्हातारी झालीय. तिला कोणी नाही आमच्याशिवाय, तेव्हा ती हयात असेपर्यंत मी कुठे जाणार नाही. तिच्या मृत्यूचा तेरावा दिवस उलटला की मी येईन तुमच्याबरोबर हिंगण्याला."

---

* १० डिसेंबर १९६७–महाराष्ट्र टाईम्सच्या सौजन्याने.

### निधी गोळा करायचेही तंत्र असते

हिंगण्याचं आकर्षण असूनही शांताबाईंनी आपला शब्द पाळला. आजी वारली आणि वामनरावांचे जामात (बाबूराव ऊर्फ परशुराम केशव केतकर) त्यांना हिंगण्याला घेऊन गेले. बायांनी त्यांची स्वतःच्या मुलीसारखी काळजी घेतली. पहिले वर्षभर स्वयंपाक करणं एवढंच काम शांताबाईंकडे होतं वर्षानंतर त्यांचं शालेय शिक्षण सुरू झालं. सारं शिक्षण नादारीवर होत होतं. परंतु मराठी ६ वीत शांताबाई नापास झाल्या आणि त्यांची नादारी गेली. शिक्षण पुरं करता येईल की नाही असा प्रश्न उभा राहिला. पण एका मैत्रिणीनं अर्धनादारीचे पैसे पुरविले आणि शांताबाई फायनल झाल्या. पुढे ट्रेनिंगही झालं. पुण्याला येऊन त्यांनी व्यायामाचं शिक्षण घेतलं आणि मग जेजुरी, पुणे अशा नोकऱ्या करीत अखेरीस त्या मुंबईला चिकटल्या.

" हिंगण्याहून निघाले तेव्हाच निश्चय केला होता, " शांताबाई बोलत होत्या, " की ज्या संस्थेनं मला मोफत सांभाळलं आणि मला माझ्या स्वतःच्या पायावर उभं केलं त्या संस्थेसाठी आपण काहीतरी निश्चित करायचं. पण करायचं म्हणजे तरी काय करणार ? मी स्वतः काही फार मोठी देणगी देऊ शकणार नव्हते, म्हणून मग मी संस्थेसाठी भाऊबीज-निधी गोळा करायला सुरुवात केली."

" निधी गोळा करायचे धडे आम्हाला ह्यापूर्वीच कवी मायदेव व श्रीमती पार्वतीबाई आठवले ह्यांनी दिले होते. भीक मागायचंही एक तंत्र आहे; ती मागताना बोलायचं कसं नि काय, वागायचं कसं, उभं कसं राहायचं, हे त्यांनी आम्हाला शिकवलं, आणि त्याचा फायदा आम्हाला पुढे झाला. "

### एक लाखाचा संकल्प

ही सुरुवात झाली कोकणात. सुट्टीच्या दिवसांत मुली गावी जायला निघाल्या की, संस्थेकडून त्यांना पावती-पुस्तके देण्यात येत असत. शांताबाईही ही पुस्तकं घेऊन निव्याला जात. पण कोणाच्या घरी गेलं

की, 'आल्या भिका मागायला. हे पण शिकवलं वाटतं त्या अण्णानं ?' ह्या शद्बांत स्वागत होई. 'मग, आता तो अण्णा लग्न कधी लावून देणार तुझं?' हा प्रश्न पाठोपाठ येई. ह्या अवहेलनांना अननुभवी शांताबाई घाबरत व शेवटी पावती-पुस्तकं नातेवाईकांच्या घरी फिरवून आलेले ५-६ रुपये संस्थेच्या हवाली करीत.

निधी गोळा करायला प्रारंभ झाला तेव्हाही ह्या आकड्यात भर पडायला बराच काळ जावा लागला. वर्षाला जेमतेम १०–१५ रुपये गोळा झाले तरी डोक्यावरून पाणी. तऱ्हेतऱ्हेचे अनुभव मात्र गाठी पडत. पुढेपुढे सराव झाला, हिंमत (खरं म्हणजे निर्लज्जपणा) वाढू लागली आणि वर्षाकाठी ५००–१००० रुपयांवर मजल आली, आणि शांताबाईंचा उत्साह वाढू लागला.

आपल्या ताकदीचा अंदाज येताच त्यांनी ठरवलं की, आपण संस्थेसाठी काही विशिष्ट रक्कम गोळा करायची. ही विशिष्ट रक्कम त्यांनी ठरवली ती एक लाख. अण्णांच्या हयातीत ही रक्कम त्यांना अर्पण करायची असा बेत होता शांताबाईंचा. दुर्दैवाने तो तडीला गेला नाही. पण शांताबाईंनी पाऊल मागे घेतलं नाही. काही झालं तरी संकल्प पार पाडायचा निश्चय त्यांनी केला, आणि आज तो संकल्प पुरा होत आहे. हिंगण्याचा माणिक महोत्सव लौकरच साजरा होत आहे. त्या मुहूर्तावर शांताबाई आपली थैली संस्थेला अर्पण करणार आहेत.

निधी गोळा करायला सुरुवात झाल्यापासून अनेक कडू–गोड, आंबट-तिखट अनुभव शांताबाईंच्या पदरी आले.

सुरुवाती-सुरुवातीला त्या व त्यांच्या भगिनी आऊताई गोडबोले ह्या दोघीजणी एकत्र फिरत. एकदा त्यांना कोणीतरी एका धनिक महाराष्ट्रीयाचे नाव सुचवलं. १॥–२ मैलांची तंगडतोड करून त्या दोघीजणी त्या घराजवळ आल्या. बाहेरच्या फाटकाजवळ गुरखा नव्हता म्हणून त्या कंपौंडातून घराच्या दरवाजाजवळ आल्या आणि त्यांनी घराची घंटा वाजवली.

आतून कोणी बाई दाराशी आल्या. दाराबाहेर कोणी अपरिचित बायका उभ्या असलेल्या पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली.

"कोण तुम्ही ? आत कशा आलात ? गुरख्याला न जुमानता इथपर्यंत का आलात ?"

"दरवाजावर गुरखा नाही, म्हणून आत आलो आम्ही." शांताबाईंनी शांतपणे उत्तर दिले. "हिंगणे संस्थेसाठी निधी गोळा करतो आहोत. तुम्ही काही......"

"पण तुम्ही आत शिरलातच कशा ? आधी बाहेर व्हा पाहू !" बाई कडाडल्या.

"अहो पण आम्ही बाहेरच आहोत." शांताबाईंचा खुलासा.

"ते काही नाही, तुम्ही त्या फाटकापाशी जा अन् तिथून आत यायची परवानगी मागा."

दोघी बहिणींनी त्यांच्या सांगण्याप्रमाणे केले, तेव्हा कुठे त्यांना घरात प्रवेश मिळाला. तोपर्यंत घरातून आणखी स्त्रिया बाहेर आल्या होत्या. त्या सर्वांना शांताबाईंनी संस्थेची विनंती-पत्रके वाचायला दिली.

"आमचा विश्वास नाही ह्या भोंदुपणावर !" त्यांनी मत व्यक्त केलं. "कोण कर्वे-बिर्वे आम्ही जाणत नाही." आणखी थोडी टिंगल केल्यावर त्या स्त्रियांनी पाच रुपये काढून ठेवले हातावर नि बजावलं' "पुन्हा पाऊल टाकू नका या घरात."

"आमंत्रण दिलंत तरी येणार नाही !" पावती फाडीत शांताबाई ठसक्यात उत्तरल्या.

ह्या 'उमेदवारी' च्या काळात शांताबाईंची कमाईही फार होत नसे. अनेक खेपा घालूनही कोणी वर्गणी देत नसे. पण शांताबाईंची चिकाटी दांडगी. त्या न कंटाळता वर्षांनुवर्षे फेऱ्या मारीत आल्या आहेत. अशाच एका गृहस्थाने शांताबाईंच्या फेऱ्यांना सतत नऊ वर्षे दाद दिली नाही. पण अखेरीस त्याने हार मान्य केली व त्यांच्या हातावर वर्गणी ठेवीत तो म्हणाला, "बाई, हे तुमच्या चिकाटीचं फळ".

**असेही अनुभव**

दुसऱ्या एका बाईंनीही असाच सतत नन्नाचा पाढा चालवला होता. पण एका वर्षी मात्र त्यांनी आपण होऊन शांताबाईंना वर्गणी दिली. "माझे यजमान अंथरुणाला खिळून आहेत अर्धांगानं. म्हणून हे दान" त्यांनी खुलासा केला. त्याच्या पुढच्या वर्षी त्यांनी शांताबाईंना हलक्या आवाजात विचारलं, "बाई, माझे यजमान वारले. त्यांच्या श्राद्धासाठी मजजवळ पैसे नाहीत. एक रुपयात कोणी श्राद्ध करणार नाही पण श्राद्धाची देणगी म्हणून तुम्हाला एक रुपया वर्गणी दिली तर तुम्ही स्वीकाराल का ?" शांताबाईंनी त्या दानाचा मनःपूर्वक स्वीकार केला.

पण कित्येक ठिकाणी शांताबाईंना राजीखुषीनं वर्गणी मिळत आली आहे. चर्नी रोडच्या त्यांच्या एका ठरलेल्या कुळाकडे शांताबाई यंदा गेल्या तेव्हा त्या बाईंनी त्यांच्या हातावर एकवीस रुपये ठेवले आणि म्हटलं, "ही आमच्या गड्याच्या स्मरणार्थ देणगी." त्यांचा गडी फार जुना होता. तो गणपतीत वारला तेव्हापासून त्यांनी ही रक्कम हिंगणे संस्थेच्या नावे काढून ठेवली होती. गड्याच्या स्मरणार्थ वर्गणी देणारा धनी विरळाच.

वांद्र्याच्या एका गृहस्थांचा मुलगा दरवर्षी आपल्या शेजारच्या मुलीला भाऊबीज घालीत असे. दुर्दैवाने ही मुलगी वारली. तेव्हा त्या मुलाचे वडील शांताबाईंकडे आले नि म्हणाले, "बाई, ही माझ्या मुलाची भाऊबीज, यंदापासून ही तुमच्या संस्थेला."

पण सगळेच अनुभव असे थोडे यायला. नाना-चौकातल्या एका इमारतीला दोन जिने आहेत. अनोळखी शांताबाई एका जिन्यानं वर चढल्या तिथं त्यांना प्राप्ती काहीही झाली नाही. पण दुसऱ्या 'विंग' मध्ये काही मिळू शकेल असं समजलं म्हणून त्या तिकडे गेल्या. नंतर काय झालं कुणास ठाऊक. पण पुन्हा शांताबाई व आऊताई पहिल्याच जिन्यानं वर चढल्या. तो भाग तर पाहिल्याचं वाटू लागलं. पण खात्री नव्हती. भीतभीतच त्या एका खोलीत गेल्या. त्याचबरोबर त्या खोली-

तील तो पुरुष चक्क एक दांडकं घेऊन शिव्या देत बाहेर आला. "थांबा तुम्हाला पोलिसाच्या ताब्यात देतो. चोर आहात तुम्ही. एकदा नाही म्हणून सांगितलं तरी येता ? " कशाबशा त्या दोघीजणी तिथून सही-सलामत सुटल्या.

असे विपरीत अनुभव आले की, शांताबाई वैतागून जात. 'नको हा ताप' असे होऊन जाई त्यांना. पण लगेच अण्णांची मूर्ती त्यांच्या डोळ्यासमोर उभी राही. किती सोसलं त्या तपस्व्यानं. शिव्या तर खाल्ल्याच, पण शेणगोळेही सहन केले. मग आपल्याला फक्त शिव्या व अपमानच सहन करायला लागताहेत. त्यात काय मोठेसे, म्हणून शांता-बाई मनाला धीर देत.

आणि हा ताप आताही होतोच आहे. आता तितका ताप शांता-बाईंना होत नाही. कोणी अपमान केलाच तर मनातून झटकून टाकीत त्या पुढे चालू लागत. त्यांची ठरलेली घरं त्यांना कोणत्याही परिस्थितीत वर्गणी देतच असतात. सोपाऱ्यापासून गिरगावपर्यंत अशी अनेक घरं आहेत की जी दरवर्षी नेमानं येणाऱ्या शांताबाई व आऊताईची वाट बघत असतात. घरी भेट झाली नाही तर वाटेत भेटल्यावर तत्परतेने वर्गणी काढून देतात आणि शांताबाईंना यायला विलंब झाला तर त्यांच्या नोकरीच्या जागी जाऊन आपलं वार्षिक दानधर्माचं व्रत पुरं करतात.

एकदा एका बाईंनी शांताबाईंच्या हातात सव्वा रुपया दिला आणि सांगितलं,"मी संस्था वगैरे जाणत नाही. हा रुपया मी तुम्हाला दिलाय व चार आणे तुमच्या यजमानांना. शांताबाई गोंधळल्या. क्षणभर काय बोलावं हेच त्यांना कळेना." मला यजमान नाहीत बाई. त्यांनी सांगितलं."नसू दे. पण हे चार आणे द्या त्यांना!" हा घोळ काही शांताबाईंच्या ध्यानी येईना. शेवटी त्यांनी एक रुपयाची एक व चार आण्याची एक अशा दोन पावत्या फाडून त्या बाईंच्या हवाली केल्या.

मात्र दादरला शांताबाईंना आलेला अनुभव काही औरच म्हटला पाहिजे. तिथली एक बिल्डिंग म्हणजे शांताबाईंचे बिनधोक कूळ, एक वर्षी त्या इमारतीत एक गृहस्थ गेले व त्यांनी सर्वांना सांगितले,"यंदा

शांताबाई आजारी आहेत म्हणून इकडे येऊ शकणार नाहीत. त्यांनी मजजवळ वर्गणी द्यायला सांगितली आहे." भराभरा पावत्या फाडून ते गृहस्थ गेले.

दोन दिवसांनी शांताबाई आपल्या वार्षिक दौऱ्यावर आल्या. "हे काय शांताबाई, तुम्ही येणार नव्हतात ना यंदा?" असा प्रश्नाचा भडिमार सुरू झाला. "अहो, आम्ही त्या गृहस्थांना वर्गणी दिलीही. तुम्ही कशाला यायचा त्रास घेतलात?"

"कोण गृहस्थ?" शांताबाई बुचकळ्यात पडल्या. चौकशी अंती त्यांना सर्व हकीकत कळली. बारकाईनं शांताबाईंनी प्रत्येकाच्या दारावर पाहिलं, कसली खूण आहे म्हणून. तर प्रत्येकाच्या दारावर ४२०चा आकडा. गूढ उकलता सर्वजण नव्हंस. पण त्यांनी पटापट शांताबाईंची भाऊबीज शांताबाईंना अर्पण केली. त्या भोंदू माणसानं संस्थेची पावती-पुस्तकं चोरून नेऊन हा उपद्व्याप केला होता.

"शांताबाई, तुमचा संकल्प पुरा झालाय. मग आता निधी गोळा करण्याचं बंद करणार का?"

"नाही, नाही. काम चालूच राहणार हे. पण ठराविक आकडा नजरेसमोर ठेवून नाही, हातपाय चालू आहेत तोपर्यंत हे काम चालूच राहणार. नवीन घरं फिरणार नाही कदाचित. पण जुनी आहेत तो 'रतीब' तरी कायम ठेवणार." शांताबाईंनी भावी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली."

# पुढले एक तप

पहिले एक लाख रुपये मिळवायला शांताबाईंना २९ वर्षे लागली. पण पुढचे लाख रुपये त्यांनी ८ वर्षांत आणले व तिसरे लाख तर चार वर्षांतच आले. २० डिसेंबर १९७५ च्या 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये दोन लाख जमविल्याबद्दल शांताबाईंचा गौरव करून खालीलप्रमाणे लिहिले होते :

'हा निधी गोळा करण्याचे काम त्या एवढ्या हिरिरीने करतात की गतवर्षी त्यांनी १७ हजार रुपये गोळा केले तर त्यांच्यानंतर ज्यांचा दुसरा क्रमांक आला त्यांना अवघे ५०० रुपये गोळा करता आले! निधी गोळा करण्यातील पहिला क्रमांक आपण आजतागायत कधी सोडला नाही असे त्यांनी सांगितले. यंदा त्यांचा आकडा वीस हजारावर जाणार.'

'सकाळी मुंबईत कुठेही फिरत असल्या तरी शांताबाई ११-३० ला शाळेत हजर. त्यांनी नोकरीचे काम चोखपणे बजावून भाऊबीज जमविण्याचे काम केले हे एक आश्चर्यच. हे काम इतके गुपचूप करीत की शाळेतील त्यांच्या सहकारी शिक्षकांनाही त्याची कल्पना नव्हती. १९६८ साली एक लाख निधी जमविल्याबद्दल त्यांचा गौरव झाला त्या वेळीच त्यांच्या सहकारी शिक्षकांना त्यांच्या या महान कार्याची कल्पना आली.'

'१९६७ साली एक लाखाचा संकल्प पूर्ण झाल्यावर त्यांनी दुसऱ्या लाखाचा संकल्प सोडला आणि तो अवघ्या आठ वर्षांत पूर्ण केला. या काळात आलेल्या विविध अनुभवांबद्दल त्या म्हणाल्या, "जोगेश्वरी येथे एका गृहस्थांनी मला ५०१ रुपयांचा चेक दिला. १०० रुपयांपर्यंत देणग्या तर ५-६ जणांनी दिल्या आहेत. महागाई वाढत गेली तशा देणग्याही वाढत गेल्या असा माझा अनुभव आहे. दरवर्षी २००० पर्यंत कुटुंबांना मी भेटते. त्यातील अवघे २०-२५ परतवून लावतात. बाकी सर्व काही ना काही देतात. त्यातले त्यात सारस्वत उमदे. गोड बोलून ते देणग्या देतात. एकाही सारस्वताने मला इतक्या वर्षांत विन्मुख पाठविले नाही. खारला राहणाऱ्या एका सारस्वत महिलेनं एक लाखाचा

माझा संकल्प पूर्ण झाला आहे हे पाहून मला पाचऐवजी २५ रुपये दिले व सर्वात आधी माझा सत्कार करावयाचा म्हणून मला कापड दिले. दादर भागातील शारदाश्रमात फिरत असताना जिने चढून मला जरा चक्कर आल्यासारखं झालं. त्या वेळी सौ. भट या महिलेनं मला घरी नेऊन कॉफी वगैरे दिली. याचबरोबर आठवण ठेवून लहान-लहान रकमा देणारी सामान्य माणसं तर असंख्य भेटतात. अशामुळेच मोठा निधी गोळा होऊ शकतो.'

"आता मिळतील तेवढे पाठवायचे, संकल्प मात्र नाही. आज अण्णा असते तर त्यांनी माझी पाठ थोपटली असती. या कामात वहिणीची सतत साथ मिळाली. सावलीसारखी ती माझ्यामागे राहिली" असे जरा भारावून त्या म्हणाल्या.

सेवानिवृत्तीनंतर वाढत्या वयात प्रकृती तितकी धडधाकट राहात नाही. हे ध्यानात घेऊन दोन लाखांचा संकल्प पुरा केल्यानंतर शांताबाईंनी पुढे उद्दिष्ट ठेवले नाही हे स्वाभाविकच होते. परंतु मोकळा वेळ व लोकांची वाढती दातृत्वशक्ती यामुळे चार वर्षातच शांताबाईंनी आपले तीन लाख पुरे केले.

या प्रचंड कार्यात त्यांना आलेले काही अनुभव त्यांच्याच शब्दांत पुढे दिले आहेत.

● ● ●

**शेवटी शांताबाई सांगतात–**

भाऊबीज मिळविताना आलेले बरे-वाईट अनुभव मी लिहून काढले. त्याचा हेतू एवढाच की पुढे येणाऱ्या स्वयंसेवकांना त्यातून काही बोध मिळेल. मला विशेष खंत वाटते ती कधीकधी एखादी माजी विद्यार्थिनी संस्थेला स्वत:ला आलेला कटू अनुभव मनात ठेवून आकसाने बोलते तेव्हा. एखाद्या अन्यायाबद्दल अगर अपमानाबद्दल मनात आढी ठेवणे किती चुकीचे आहे हे मी समजावून सांगण्याचा नेहमी प्रयत्न करते. माझ्या सर्व उपकार–कर्त्यांना वंदन करून हे निवेदन त्यांच्या चरणी अर्पण करते.

● ● ●

# माझी पायपीट

☐ मी एका ठिकाणी वर्गणीला गेले होते. त्या बाईंनी नाव विचारले, नाव कळल्यावर मोलकरणीबरोबर दहा रुपये पाठवून दिले. मी विचारले, "जरा उन्हाची इथं बसले तर चालेल का?" मोलकरीण आत जाऊन विचारून आली, व म्हणाली, "बाई म्हणतात, बसता नाही येणार" मीं तशीच उन्हातून निघाले.

☐ दुसऱ्या घरी गेले. त्यांनी दार उघडले व आदराने मला बसावयास सांगून पंखा लावला. थंड सरबत दिले, त्या म्हणाल्या,"दोन वर्षांनी वर्गणीला आलात. तब्बेत बरी आहे ना?" अशी चौकशी केली. मुलाचा लग्नात काढलेला फोटोचा अल्बम दाखविला. भाऊबीज दुप्पट म्हणजे २१ रुपये दिली. पुन्हा चहा केला व ऊन कमी झाल्यावर त्या म्हणाल्या, "दर वर्षी येत जा," मी समाधानाने निघाले.

☐ अशी एका घरी वर्गणीला गेले, मालकांनी एक रुपया दिला. त्या बरोबर बायको विजेप्रमाणे मालकांवर कडाडली व माझ्या हातातून तो रुपया परत घेतला. म्हणाली, "चालत्या व्हा. कुठले कर्वे! सारं ढोंग!"

☐ मी वर्गणी गोळा करून बोरिवली गाडीत घरी येण्यासाठी बसले. एक १५/१६ वर्षाचा मुलगा माझ्या बाजूला उभा राहिला. मधूनच तो मजकडे पाही. मला वाटले एकसारखा काय बघतोय. बोरिवली आली. दारात आले, तो पण आला. मला म्हणाला, "आपण ग्रँटरोडला आमच्या घरी येता. उतरल्यावर थांबा." मी उतरून थांबले त्या मुलाने तीन पेढे मला दिले, व नमस्कार केला. म्हणाला," मी पास झालो.," मी त्याला गोड आशीर्वाद दिला. त्याने एक रुपया भाऊबीज दिली, मी म्हटले, "तुझ्या घरी येणार आहे तुझी आई देईल." तो. म्हणाला,"अगोदर माझी घ्या व मग आई देईल ती घ्या." मला त्या मुलाचे कौतुक वाटले.

□ एक दिवस मी वर्गणीहून घरी येत होते. मी चंदावरकर रोडला चालत होते तोच एक २५/३० वर्षाची बाई मागून आली व तिने मला हाक मारली "शांताबाई थांबा." मी थांबले. त्या म्हणाल्या, "मी तुमची आठवण काढीत चालले होते तोच तुम्ही दिसलात. हे पाच रुपये भाऊबीज घ्या. ओक नावाच्या गृहस्थांनी मजकडे पैसे दिले." मी आनंदाने पाच रुपयांची पावती दिली. त्या म्हणाल्या, "ओकांचा पत्ता मला माहीत नाही. तुम्ही त्यांचे नाव व ठाणे म्हणा." "दुसऱ्या एक रुपयाच्या दोन पावत्या द्या व ' क्ष ' म्हणून लिहा" तसे करून मी पावत्या दिल्या. खरे म्हणजे मी त्या बाईंना ओळखले सुद्धा नव्हते. परंतु त्यांनी मला ओळखले. मी आडनाव विचारले. "जोशी" म्हणाल्या व घाईने निघून गेल्या. त्यांची ही भक्ती पाहून मला खूपच आनंद झाला.

□ एका घरी वर्गणीला गेले. घरात सून होती. प्रथमच मी पाहिली. मी म्हटले, "भाऊबीज मागायला आले. सासूबाई आहेत का ?" ती म्हणाली, "दरवर्षी येताना ?" "होय" म्हटले, "तर मग सासूबाईंचे पाच रुपये व माझे १०१ रुपये देते. मी दरवर्षी देईन." नंतर आपल्या यजमानांना म्हणाली "मला एकशे एक रुपये द्या." यजमान विनोदाने म्हणाले, "तुला देण्याचा इतका कसा झटका आलाय ?" तिने मला १०१ रुपये दिले. मी पावती दिली. मला खरोखर तिचे कौतुक वाटले. केवढा मनाचा मोठेपणा !

□ अशीच मी वर्गणीला एका बिल्डिंगमध्ये गेले, बेल दाबली. १० वर्षाच्या मुलाने दार उघडले. मी विचारले, "तुझे आई-वडील आहेत का ?" तो म्हणाला, "आहेत" मी म्हणाले "त्यांना सांग भाऊबीज मागायला आल्या आहेत." -- त्याने तसे सांगताच वडील म्हणाले, "त्यांना म्हणावे ' देत नाही वर्गणी. ' दार लाव. -- त्याने दार लावले तशी मी खाली उतरत होते. वडिलांनी दार उघडले व म्हणाले, "शिव्या देत जाता काय ? मी तुमच्या हेड ऑफिसला कळवतो. -- मी म्हटले, "मी शिव्या दिल्या नाहीत तुम्ही नाही

म्हणालात तशी मी खाली उतरले आहे." त्यावर ते कडाडले. "जास्त बोलता ?" चालत्या व्हा. मला खूपच वाईट वाटले. पुन्हा मनाशी समजूत करून काम चालू केले.

□ एकदा मी अशीच सारस्वत कॉलनीत वर्गणीकरिता गेले होते. ६–७ वर्षाच्या मुलाने स्टुलावर स्टुल ठेवून दार उघडले. "काय आजी म्हणता?" तेव्हा मी म्हटले, "कर्व्यांच्या शाळेतून वर्गणी मागायला आलेय. तुझ्या आई-वडिलांना बोलाव." तो म्हणाला, "आई बाबा घरी नाहीत. मी आजीला बोलावतो." आजी सरपटत सरपटत बाहेर आली. मी म्हटले, "मी भाऊबीज मागायला आल्ये. तुम्हाला शक्य असेल ते द्या." त्या म्हणाल्या, "माझा मुलगा असेल तेव्हा या." त्यावर तो छोटा मुलगा म्हणाला, "थांबा. माझ्या खाऊचे सहा आणे आहेत ते घ्या." अर्थात ते मी घेतले नाहीत. त्याचे कौतुक वाटले. त्याची पाठ थोपटली व गोड पापा घेऊन निघाले.

□ एका चाळीत गेले तेव्हा न्हावीदादा आपल्या मालकाची दाढी करीत होते. मालकांनी मला म्हटले, "या मावशी" व घरात सांगितले, "ह्यांना चहा ठेव." न्हाव्यानी विचारले "या कोण ?" "ह्या दर वर्षी हिंगणे संस्थेकरिता वर्गणी मागायला येतात" मालक म्हणाले. न्हाव्यानी मालकाकडे आठ आणे मागितले व म्हणाले, "ही घ्या माझी भाऊबीज." मी म्हटले, "नको." त्यावर ते म्हणाले, "कमी वाटतात का ?" मी म्हटले, "नाही, फार झाले. पण तुमच्या सारख्या गरिबांनी कशाला द्यावेत ?" ते म्हणाले, "मी कर्व्यांना ओळखतो. त्यांचा १०० वा वाढदिवस झाला ते कर्वे ना ?" मी त्याचे कौतुक केले.

□ एका बाईकडे मी गेले होते. त्या दर वर्षी अकरा रुपये देत. यजमान म्हणाले, "काही द्यायचे नाहीत अकरा रुपये, पाच रुपये द्यायचे." बाईंना खूप वाईट वाटले. मी म्हणाले, "असू द्या पाच रुपये." मी त्यांची समजूत घातली. पुरुषांच्या पुढे बायकांचे काही चालत नाही त्याचे हे उत्तम उदाहरण आहे.

☐ दादरला एका बिल्डिंगमध्ये मी गेले होते. दरवाजा उघडा होता. मी दारात उभी राहिले. आठ दहा वर्षांचा मुलगा समोर उभा होता. तो म्हणाला, " काय हवंय आजी ? " मी विचारले, " आई कुठाय ? " तो म्हणाला, " आधी मला काय काम आहे ते सांगा. " मी म्हटले, " कर्व्यांच्या शाळेची वर्गणी मागायला आले आहे. " तशी त्याने घरात जाऊन झटकन तिसरीचे पुस्तक आणले आणि अण्णांचा धडा काढून चित्राकडे हात दाखवून म्हणाला, " हेच ते कर्वे ना ? " मी " हो " म्हटले,. तो आईला म्हणाला, " पाच रुपये वर्गणी दे. " आई म्हणाली, " मी दोन रुपये देणार आहे. " तो रागाने म्हणाला. " नाही नाही, तुमच्यासाठी शाळा काढली आहे ना ? पाच रुपये देच." आईचा नाईलाज झाला. तो मुलगा जिन्यापर्यंत पोचवायला आला आणि म्हणाला, " आजी दरवर्षी वर्गणी मागायला या. " अण्णांचा धडा वाचून किती परिणाम झाला ! त्याचे हे एक उदाहरण आहे. त्याची पाठ थोपटून मी दुसऱ्या घरी गेले.

☐ फिरत असताना एका चाळीमध्ये शिरले. दारावरची बेल दाबली. एका ६० वर्षांच्या गृहस्थाने दार उघडले. मला प्रश्न केला, " काय पाहिजे तुम्हाला ? " मी म्हटले, " हिंगण्याची भाऊबीज मागायला आले आहे. " त्यावर ते म्हणाले, " मुळीच देणार नाही भाऊबीज हिंगण्याकरिता. तुम्हाला एक रुपया देतो. " व अण्णांना शिव्या देऊ लागले. " मला नको भाऊबीज, अण्णांना शिव्या का देता ? शिव्या देण्याचे कारण काय ? " ते म्हणाले, " अण्णांनी पुनर्विवाह केला. मग इतर विधवांना का नाही करायला लावला ? एकही विधवा दिसता कामा नये. " मी म्हटले, " ते कसे सक्ती करणार होते ! " ते बडबडत होते ते मला ऐकवेना. भाऊबीज न घेता मी पुढचा रस्ता धरला.

☐ एका बाईकडे गेले. मी विचारले, " भाऊबीज देणार का ? " तिचा मुलगा आंधळा होता. तो म्हणाला, " माझा एक रुपया घ्या."

मी म्हटले, "कशाला? राहू दे. आईचे पाच रुपये घेतले." तो मुलगा म्हणाला. "दर वर्षी या." त्याचे मला कौतुक वाटले.

□ विरारचे डॉ. सामंत यांच्या पत्नी गुलीकडे माहीमला गेल्या होत्या. त्यांनी मला वरूनच बघितले व म्हटले, "या मावशी." मी आत गेले. "तुमचे कष्ट व अण्णांची कामगिरी पाहून यंदा पंचवीस रुपये देणार आहे, पुस्तक द्या." "मी पुस्तक दिले." त्यांनी आपले पंचवीस रुपये, पहिल्या मुलीचे पंचवीस व दुसऱ्या मुलीचे पंचवीस रुपये दिले. एका घरी रु. ७५ मिळाल्याबद्दल आनंद झाला. दोन ठिकाणी माझ्याबरोबर येऊन त्यांना माहिती सांगून दहा रुपये मिळवून दिले व सांगितले, "दरवर्षी या." त्यांनी मला निरोप दिला. संस्थेबद्दल प्रेम, माझ्याबद्दल सहानुभूती व लाघवी स्वभाव वाखाणण्यासारखा आहे.

□ माहीमला एका सोसायटीत गेले. बेल वाजवली. २२ वर्षांची लग्न झालेली मुलगी पुढे आली. तिने मला आत बोलाविले. आपले दहा रुपये भाऊबीज दिली व म्हणाली, "माझ्या आईकडे गोरेगावला जाल का? ती ५१ रुपये देईल." मी म्हटले "कशाबद्दल?" "माझ्या डोहाळे जेवणाचे. मला हौस नाही. ते पैसे मी हिंगणे संस्थेला देणार आहे." तिचा तो त्याग ऐकून मला नवलच वाटले. हौसमौज बायकांना असते. पण तिला आवडत नव्हते. चार दिवसांनी मी तिच्या आईकडे गोरेगावला गेले. आईने डोहाळे जेवणाचे रु. ५१ भाऊबीजेसाठी दिले. मी पावती दिली. मला फार कौतुक वाटले.

□ दादरला एक बाई रहात होत्या. त्यांनी चातुर्मासाचा नेम केला होता की देवापुढे रोज दहा पैसे ठेवायचे. चार महिने झाल्यावर त्यांनी मला निरोप पाठवला. मी त्यांच्या घरी गेले. तो सर्व खुर्दा त्यांनी माझ्यापुढे ठेवला. रु. ३५ झाले. ते सर्व मला दिले मी पावती दिली. "भटजींना देण्यापेक्षा अशा संस्थेला दिले तर उपयोग होईल. आपली कामगिरी पाहून मला स्फूर्ती आली." त्या बाईचे विशेष कौतुक वाटले. मी त्यांना शुभेच्छा देऊन जिना उतरले.

□ खार येथील एका बाईकडे गेले. तिने पाच रुपये दिले. तिची छोटी मुलगी तिथे होती. ती बोलली, " माझे पण रुपये घ्या. " रोज तिला बाबा खाऊसाठी पैसे देत. तिने ते सहा रुपये साठविले होते. मी बाईला विचारले, " घेऊ ना ? मी काही मागत नाही. " " घ्या, ती देतेना ?" तिने खाऊ न खाता संस्थेला ते सर्व रुपये दिले. एवढ्या लहान वयात हा मनाचा मोठेपणा !

□ एकदा मी भाऊबीज समारंभात थैली अर्पण करण्याकरिता चालले होते. डबा महिलांचा होता. माझ्यासमोर तीन महिला बसल्या होत्या. सहज गप्पा करताना त्यांनी मला विचारले, " कुठे जाता ? काय आहे हिंगण्यात ?" मी उत्तर दिले, " समारंभ आहे. " " कसला समारंभ ?" " भाऊबीज समारंभ." " तुमचा काय भाऊबीजेशी संबंध ? " त्यावर मी म्हटले, " माझा बराच संबंध आहे. मी हिंगण्याला शिकले. त्यांनी मला जीवन दिले. आज माझ्या हस्ते भाऊबीजेची थैली अर्पण होणार आहे. " " किती भाऊबीज जमवलीत ?" त्यावर मी म्हटले, " अठरा हजार " ते ऐकून त्यांना खूपच आनंद झाला. प्रत्येकीने एकेक रुपया माझ्या हातात दिला.

□ रांगणेकर नावाचे गृहस्थ माहीमला राहतात. त्यांच्याकडे मी कित्येक वर्षे जाते. ते पाच रुपये दरवर्षी देतात. माझा सत्कार झालेला वर्तमानपत्रात वाचून त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी हिंगण्याला १९७६ च्या मे महिन्यात पाहुणे म्हणून आलेल्या नेरुरकर यांच्याबरोबर रु. १२ पाठविले. ते गृहस्थ माझी खोली शोधून माझ्या खोलीवर आले. त्यांनी मला विचारले, " आपणच का शांताबाई परांजपे ?" मी म्हटले, " होय. आपण कोण ? मी ओळखले नाही आपल्याला. " त्यांनी आपली ओळख सांगितली. " हे रांगणेकरांनी अकरा रुपये दिले आहेत." मी म्हटले, " कशाबद्दल ?" " त्यांनी भाऊबीज दिली आहे." " पेपरमध्ये तुमची बातमी वाचून त्यांना फार आनंद झाला म्हणून त्यांनी जादा भाऊबीज दिली आहे. " मी पावती दिली. मला त्यांचे फार कौतुक वाटले. मी मुंबईला परत गेल्यानंतर रांगणेकरांचे आभार मानण्याकरिता मुद्दाम गेले. ते म्हणाले, " आभार कसले मानता ? तुम्ही कष्ट करता. साथ नको का द्यायला ? आम्ही मोठे उपकार करत नाही."

त्यांनी फिरून पावती पुस्तक मागितले. स्वत:चे पाच रुपये व मुलीचे पाच रुपये अशा दोन पावत्या केल्या. खरोखर अशा गृहस्थाचे कौतुक वाटते. त्यांच्या मुलीचे लग्न डिसेंबरमध्ये होते. त्यांनी मला आग्रहाचे निमंत्रण दिले. "तुम्ही याच अक्षदा टाकायला व शुभ आशीर्वाद द्यायला." ❧

□ मी विरारच्या गाडीत बसले. माझ्या बाकासमोर दोन गृहस्थ बसले होते. एक होते कीर्तनकार व दुसरे पारशी. कीर्तनकारांनी माझी माहिती विचारली. मी सर्व सांगितली. ते म्हणाले, "आता शाळा नाही. मग तुम्ही कुठे जाता ?" मी सांगितले, "भाऊबीज मागायला". "कुठली भाऊबीज ?" "हिंगणे संस्थेची". त्यांनी नाव ऐकल्याबरोबर मला दोन रुपये दिले. मी आभार मानून पावती दिली. ❧

□ एकदा गावदेवीला एका गृहस्थांकडे गेले. ते म्हणाले, "चार दिवसांनी या." चार दिवस झाल्यावर मी त्यांच्याकडे गेले. ते गृहस्थ बाहेर आले व म्हणाले, "अहो मी म्हटले खरे, पण आणखी आठ दिवसांनी या. मी ५१ रुपये देणार आहे." मी नंतर आठ दिवसांनी पुन्हा गेले व म्हणाले "तुम्ही सांगितल्याप्रमाणे आले." "मी म्हटले खरे. चालत्या व्हा. मी काही देणेकरी आहे का तुमचा ?" त्यांना वाटले मी पुन्हा पुन्हा येणार नाही. मी मनातून खूपच रागावले. वाईटही वाटले. कशाला गेले असे झाले. हा एक अजब नमुना ! ❧

□ मी हिंदु कॉलनीत गेले होते. खूपच ऊन लागले. तहान लागली होती. एका बिल्डिंगमध्ये गेले. एका बाईला म्हटले, "पाणी देता का?" ती बाई माझ्याकडे तशीच बघत राहिली. काही न बोलता निघून गेली. मी पण तशीच उभी होते- आता आणील, मग आणील म्हणून खूप वेळ वाट पाहिली व पाणी न पिता तशीच चालू लागले. ती बाई वरून बघत होती तिला काय वाटले कुणास ठाऊक. कदाचित पूर्वी कोणाचा वाईट अनुभव आला असेल. ❧

□ अशीच एका घरी गेले होते, ते गृहस्थ जेवायला बसले होते. "या बसा काय म्हणणे आहे तुमचे?" मी म्हटले, "कर्व्यांच्या शाळेकरिता वर्गणी मागायला आले आहे." ते विद्यार्थी होते याची मला कल्पना नव्हती. ते तसेच पानावरून उठले व पैसे शोधायला लागले. शेवटी एक रुपया सापडला. "हा एक रुपया घेता का? माझ्या वडिलांची मनिऑर्डर

आली नाही. नाही तर जास्त दिले असते. कर्व्यांबद्दल मला खूप आदर आहे व तुमच्याबद्दलही. फिरून केव्हा आलात तर जास्त देईन." त्याच्या हावभावावरून त्याची तळमळ दिसत होती. मी म्हटले, "काहीही हरकत नाही." आनंदाने त्याचा निरोप घेतला.

□ मागे मी कोर्टाकडे वर्गणीसाठी जात असे. मधल्या सुट्टीत रजिस्ट्रारना भेटत असे. दारावरचे शिपाई आत जाऊ देत नसत. मी एका गृहस्थांना सांगितले, "माझा एवढा कागद रजिस्ट्रारना वाचून दाखवता का ?" हा आमचा संवाद मॅजिस्ट्रेटसाहेबांनी ऐकला व ते बाहेर आले. "काय बाई तुमचे म्हणणे ?" ते माझ्याशी मराठीतून बोलत होते. मला वाटले त्यांना मराठी येत नसेल, माझा अंदाज चुकीचा ठरला. त्यांनी मला आत बोलावले व पावती पुस्तक घेऊन शंभर रुपयांचा आकडा घातला. मला खूपच आनंद झाला. मला नमस्कार करून म्हणाले, "दर वर्षी या."

□ अशीच मी माझगाव कोर्टात गेले होते. तेथे देवधर नावाचे गृहस्थ होते त्यांना मी संस्थेबद्दल माहिती सांगितली व आम्ही दोघी बहिणी तेथे बसून राहिलो. कोर्टाकडे काही धर्मादाय पैसे असतात. देवधरांनी मॅजिस्ट्रेटना भेटून रु. ३०० आणले, मी पावती करून दिली व आभार मानले. ते म्हणाले "दर वर्षी येत जा. मी काम करीन." मनुष्यस्वभावात किती फरक असतो ते दिसून आले.

□ एका चाळीत गेले होते. तेथे ४–५ मुले खेळत होती. ती म्हणाली, "काय हवंय आजी ?" मी म्हणाले, "कर्व्यांच्या शाळेकरिता वर्गणी मागायला आलेय." कर्व्यांचे नाव ऐकून त्यांना आनंद झाला, कारण त्यांना कर्व्यांचा धडा पुस्तकात गेलेला होता. प्रत्येक मुलाने एक एक रुपया आपल्या आईकडून आणला व म्हणाली, "आम्हाला एक एक रुपयाची पावती द्या." मी त्यांना पावत्या दिल्या. ती मुले माझ्या पाठीमागून आली व आईला म्हणाली, "आम्ही एक एक रुपया दिला. तुम्ही दोन दोन रुपये द्या." त्या सर्वांनी दोन-दोन रुपये आनंदाने दिले. मला त्या मुलांचे खूपच कौतुक वाटले.

□ दुसऱ्या एका बिल्डिंगमध्ये गेले होते. दोन बिऱ्हाडकरूंनी 'नाही' सांगितले. तिसऱ्या खोलीत गेले. तेथील गृहस्थ म्हणाले,

" आजच तुमची आठवण काढली. या बसा." त्यांनी चिल्लरीची थैली माझ्यापुढे ओतली आणि म्हणाले, " हे घ्या. हे पैसे मंगळागौरीपुढचे आहेत." सर्वांनी ती रक्कम मोजली, तेरा रुपये भरले. पावती करून दिली. दर वर्षाप्रमाणे त्यांनी आपले पाच रुपये दिले. हल्ली लोकांचा कल भिक्षुकांना देण्यापेक्षा चांगल्या संस्थेला देण्याकडे दिसून येतो.

□ मी एका पोलीस लाइनीत गेले असता एका पोलिसाच्या खोलीवर गेले. " कोण तुम्ही ? कशाकरता आला आहात ? " मी थोडक्यात माहिती सांगितली. त्या बाई म्हणाल्या, " तुम्ही इथंच थांबा. मी सर्व बायकांकडून वर्गणी गोळा करते." त्याप्रमाणे प्रत्येक बाईने आपल्या ऐपतीप्रमाणे वर्गणी दिली. आपली माहिती सांगितली. मी पावत्या दिल्या. मला चहा दिला. सर्वांचे आभार मानून जिना उतरत असताना म्हणाल्या, " दर वर्षी या." त्यांची एकजूट दिसली. त्यांचे मला विशेष कौतुक वाटले.

□ एक डॉक्टर होते. त्यांच्याकडे मी दरवर्षी जायची. ते दरवर्षी प्रत्येकाची भाऊबीज काढून ठेवून मला पंचवीस रुपये द्यायचे. त्याप्रमाणे मी गेले असता ते वारल्याचे समजले. गड्याने दार उघडल्यावर तो म्हणाला, " तुम्हाला कळले नाही का ? डॉक्टर गेले." मला खूप वाईट वाटले. कर्तव्य म्हणून त्यांच्या बायकोची भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली. बायकोने आत बोलाविले मला बघितल्यावर त्यांना गहिवरून आले. मी त्यांची समजूत घातली. त्या माझ्यापेक्षा वयाने मोठ्या होत्या. " तुमचे बंधू गेले. त्यांनी तुमची भाऊबीज काढून ठेवली आहे." मी अतिशय दुःखाने ती भाऊबीज घेतली व पावती दिली. त्यांची बायको म्हणाली, " कर्तव्य हे श्रेष्ठ असते. ही पंचवीस रुपये भाऊबीज तुम्हाला घ्या." एवढ्यात त्यांचा मुलगा आला आणि म्हणाला, " आता ह्याच्या पुढे येऊ नका. ही शेवटची भाऊबीज." दोन व्यक्तींमध्ये केवढा हा फरक असे अधून मधून मनात येते.

□ वर्गणीमुळे माझ्या पुष्कळ ठिकाणी ओळखी झाल्या आहेत. लग्नाला, मुंजीला बारशाला वगैरे सोहाळ्यांना मला जावे लागते. फूल ना फुलाची पाकळी मला द्यावी लागते. अशाच एका ठिकाणी मी गेले असता मुंज झाली. पानसुपारी झाली व मग भिक्षावळ सुरू झाली.

मी मुंजा मुलाला भिक्षावळ द्यायला गेले. त्यावर तो मुलगा आपल्या आईला म्हणाला, " ह्या आजी आल्यात कर्व्यांच्या शाळेतल्या. बाबांना बोलाव." बाबा आल्यावर त्यांना म्हणाला, " माझ्या भिक्षावळीतले पाच रुपये काढून त्यांना द्या. " मी म्हटले, " तुझी भिक्षावळ अजून व्हायची आहे." तो ऐकेना. मी पाच रुपये घेऊन त्याला पावती दिली. सर्व बायकांना आश्चर्य वाटले. मी त्याला शाबासकी देऊन निरोप घेऊन निघाले.

□ दर वर्षीप्रमाणे मी जयविजय सोसायटीत भाऊबीजेला गेले होते. एका ब्लॉकची घंटा वाजवली. बाईंनी दार उघडले व हसत स्वागत केले व म्हणाल्या, " मी आपली वाटच पहात होते. बरे झाले. पावती करा. मी चहा आणते." माझ्या हातात त्यांनी शंभराच्या पाच नोटा व एक रुपयाची नोट दिली. मी आश्चर्याने म्हटले, " आपण किती रुपये दिलेत ?" त्या म्हणाल्या, " पाचशे एक." मी थक्कच झाले. " इतके पैसे दिलेत. आपली काही अट आहे का ?" त्या म्हणाल्या, " अट कसली नाही. माझ्या मुलाची मुंज झाली. आम्ही वाह्यात खर्च न करता थोडक्यात करून हजार रुपये वाचवले. त्यातले ५०१ तलासरीला दिले व ५०१ तुमच्या संस्थेला भाऊबीज म्हणून ठेवले ते तुम्हाला दिले, चांगल्या कार्याला लागले. " मला अतिशय आनंद झाला. केवढा हा दिलदारपणा ! एकाच घरी मला इतकी भाऊबीज मिळाली. असे उदार लोक मिळाल्यावर थैली भरायला किती वेळ ? मी चहा घेतला व मुलाला आशीर्वाद देऊन आभार मानले व निरोप घेतला.

□ मी घरी बसले होते. एक गृहस्थ आले. ते माझ्या मैत्रिणीचे यजमान होते. मी ' या ' म्हटले. ते म्हणाले, " मी एक गोड बातमी आणली आहे." " कसली गोड बातमी ?" " माझ्या मुलीचे लग्न ठरले आहे. बैठकीतून थेट तुमच्याकडे आलो. " मी सर्व चौकशी केली. मला ऐकून आनंद झाला खरा पण माझी मैत्रीण कैलासवासी झाली होती म्हणून वाईटही वाटले. ती आज हवी होती म्हणजे चांगले झाले असते." पण त्यांनीच माझी समजूत घातली व म्हणाले, " मी तिच्या नावाने ५१ रुपये भाऊबीज म्हणून आज एप्रिलमध्येच देत आहे. " माझ्या बॅगेत पावतीपुस्तके नेहमी असतातच. मी पुस्तक काढून लगेच पावती दिली.

एकदम एकावन्न रुपयाची भर पडली. मी त्यांचे मनापासून कौतुक करून आभार मानले व मुलीला गोड आशीर्वाद दिला.

☐ मकरंद सोसायटीत गेले होते. तेथे गेल्यावर दार वाजवले. बाईंनी दार उघडले व म्हणाल्या, "या आजी." मी आत गेले व बसले. भाऊबीजेची माहिती सांगून ऐपतीप्रमाणे काही मदतीची याचना केली. बाई म्हणाल्या "मंगळवारी या. आमच्या लग्नाला २५ वर्षे पूर्ण होताहेत. माझे यजमान घरी असतील ते बरेच पैसे देतील" त्याप्रमाणे मी गेले. यजमानांनीच दार उघडले. प्राथमिक गप्पा झाल्यावर पंडितांनी मला एकशे एक रुपये वाढदिवसानिमित्त भाऊबीज दिली व ब्लाऊज पीस दिला. "मी दरसाल नवे जुने कपडे मुलींकरिता नेते" असे बोलले होते बायको-जवळ, म्हणून त्यांनी कापड दिले. मी त्यांना आशीर्वाद देऊन घरी आले.

☐ एकदा एका छोटया चाळीत वर्गणीला गेले होते. मला पाहून सर्व बायका घाबरल्या. "त्यांना वाटले ही बाई चोर तर नसेल ना?" पण मी त्या सर्व भगिनींना संस्थेची माहिती सांगून माझी ओळख करून दिली. तेव्हा त्या शांत झाल्या व मला बसायला सांगून प्रत्येकीने एक एक रुपया आणला. मी नावे घालून पावत्या दिल्या. त्याच चाळीत एक स्वयंपाकीण बाई होत्या. त्या म्हणाल्या, "अहो माझ्या जवळ पैसे नाहीत. मी एक किलो तांदूळ देते, ते घ्याल का?" मी म्हटले, "मी घरोघर हिंडणार तिथे हे तांदूळ मला फिरवावे लागतील." त्यावरून शेजारीण म्हणाली, मी तुम्हाला पाच रुपये देते म्हणजे या बाईंना तांदूळ मिरवायला नकोत." मी म्हटले देव पावला. स्वयंपाकीण बाईंना म्हटले, "द्या. तुम्हाला काय द्यायचे ते" त्यांनी पाच रुपये दिले. मला त्यांचे फार कौतुक वाटले. मी सर्वांचे आभार मानून निघाले. त्या सर्व बायका मला जिन्यापर्यंत पोचवायला आल्या व म्हणाल्या, "दर वर्षी येत जा. फूल ना फुलाची पाकळी देत जाऊ!" मनाच्या मोठेपणाचा नमुना!"

☐ वर्गणीचे काम चालू झाले की सकाळी पाच वाजता मी घरातून बाहेर पडत असे. तशीच एकदा जात असताना पुरुषांच्या डब्यात चढले. संस्थेचा अहवाल वाचायला काढला कारण त्याच्यात नावे छापलेली असतात. समोरच एक गृहस्थ बसले होते. त्यांनी तो

अहवाल मागितला. वाचला व ते म्हणाले, "हे सर्व खरेच आहे कशावरून ?" जवळ बसलेले गृहस्थ म्हणाले, "अहो हे जगजाहीर आहे. मग धोका कसला ?" पण पहिले गृहस्थ आपले अण्णांना शिव्या देऊ लागले. मी नम्रतेने म्हटले, "पटत नसल्यास भाऊबीज देऊ नका पण माझ्या वडिलांना शिव्या कशाला देता ?" पण त्या गृहस्थांची बडबड चालूच होती. शेजारच्या माणसाने दोन रुपये दिले. मी लगेच पावती दिली. ते म्हणाले, "पावती काय करायची ?" मी म्हटले, "पावती दिल्याशिवाय पैसे घ्यायचेच नाहीत. माझे नाव खराब व्हायला नको." "बाई तुमचा व्यवहार चोख आहे." इतके बोलून ते दादरला उतरले. इतक्यात एकाने पाच रुपये व तिघांनी दोन–दोन रुपये दिले. मी पावत्या दिल्या. त्यांनी आदराने माझ्या पायाला हात लावून नमस्कार केला व महालक्ष्मीला उतरले. माणसामाणसांच्या स्वभावाची तुलना करीत मीही ग्रँट रोडला उतरले.

□ एका सोसायटीत गेले. ब्लॉकचे दार उघडे होते. मी म्हटले, "आपण मला भाऊबीज देणार का ?" त्यावर ते गृहस्थ म्हणाले, "सख्या बहिणीलासुद्धा भाऊबीज देत नाही." "का ?" "तिचे माझे पटत नाही." मी जरा लोचटपणाने म्हटले, "मायेच्या भगिनींच्या संस्थेला तरी काही भाऊबीज द्यावी अशी मी विनंती करते." त्याबरोबर मला शिव्या देत ते गृहस्थ आत गेले. जाताना म्हणाले, "थांब." मला आशा वाटली पण त्यांनी मला काठीने ढोसून बाहेर ढकलले व दार लावून घेतले. मला वाईट वाटले. तशीच समोरच्या ब्लॉकची बेल दाबली. त्या गृहस्थांनी दोन दोन रुपये दिले व म्हणाले, "समोर जाऊ नका. शिव्या खाल." मी म्हटले, "शिव्या काय ? काठीचा ठोसाही खाल्ला." हे ऐकून त्यांना फार वाईट वाटले. ते म्हणाले, "पुन्हा चुकूनसुद्धा जाऊ नका तिकडे. चालायचेच. कार्यकर्त्यांना कडूगोड अनुभव येणारच ! आता पुढच्या वर्षी या हं" असे म्हणून त्यांनी मला नमस्कार करून दार लावले. असे एकेक अजब नमुने !

□ आमच्या येथे रोज फूलवाला येतो. मी पण फूलपुडी लावली. परंतु त्याची माझी भेट क्वचितच होई. कारण मी उजाडताच वर्गणीला गेलेली असे. एक दिवस माझी भेट झाली तेव्हा मी पावती-पुस्तके

काढून मोजीत होते. ते पाहून त्याने कसली पुस्तके म्हणून चौकशी केली. मी थोडक्यात माहिती सांगितल्यावर म्हणाला, " गरिबाचा एक रुपया घ्याल काय ?" मी म्हटले, " आनंदाने घेईन. न मागता देता त्याची किंमत मोठी आहे." मी पावती दिल्यावर म्हणाला, " माझा ईश्वास ह्यावर मोठा हाय. तुमचं काम कष्टाचं हाय " मला त्याच्या उदारपणाचे कौतुक वाटले. अशी गरीब माणसे मला बरीच भेटली आहेत. त्यांची मी आभारी आहे. आमच्या माहीमच्या शाळेत सोनाबाई म्हणून शिपाई होती तीही मला दरवर्षी एक रुपया देई.

□ मी भारतदर्शनमधून नेपाळपर्यंत यात्रेला गेले. पाटण्याला गाडी थांबली. आमचा बोगीचा डबा सुटा झाला. आजूबाजूचा थोडा भाग पाहून आम्ही सर्व विमानतळावर गेलो. तपासणी झाली. बायकांची तपासणी बायकाच करीत होत्या. त्यात एक तपासणीस बाई मला पाहून म्हणाल्या, " आपण शांताबाई परांजपे ना ?" मी म्हटले " होय. आपण मला कसं काय ओळखलं ?" त्या म्हणाल्या, " आपण भाऊबीज जमवता ना ? मी तुम्हाला ओळखते. माझ्या आईकडे तुम्ही येत होता. आई भाऊबीज देत असे. खूप दिवसांनी भेट झाली. मी तुम्हाला पाच रुपये देणार आहे. पावती नको. तुमच्याजवळ नसेल." मी म्हटले, " मजजवळ नेहमी दोन तरी पुस्तके असतात." त्या म्हणाल्या, " आपली कमाल आहे. आपलं संस्थेवरील प्रेम अगाध आहे. मला आपलं कौतुक वाटतं." मी म्हटले. " संस्थेने आश्रय दिला. मी शिकून नोकरी केली. नाही तर माझ्यासारखी सामान्य बाई विमानानं जाती का ?" मी पावती केली. नाव विचारले पण त्यांनी सांगितले नाही. 'क्ष' घालायला सांगितले. गडबडीने बाईंचे आभार मानून विमानात चढले. अण्णांचे मनोमन स्मरण केले. हा माझा प्रवास माझ्या आयुष्यातला सुवर्णाक्षरांनी लिहिण्याजोगा होता. नेपाळ देश छानच आहे. तो पाहून मला धन्यता वाटली. यात्रा उत्तम पार पडली.

□ मी गावदेवी भागात प्रथमच भाऊबीज मागायला गेले होते. राऊत बंगल्यात गेले. बाईंना म्हटले, " कर्वे आश्रमाला यथाशक्ती भाऊबीज द्याल का ?" सौ. राऊतबाईंनी मला माझी माहिती विचारली. ती थोडक्यात सांगितली. बाई म्हणाल्या, " संस्थेला कशाची

गरज आहे" मी म्हणाले, "कापड' भांडी, कपाट सर्वच लागते" त्यावर त्या म्हणाल्या, "आमच्या महिला संघटनेतर्फे एक पितळी बादली दिली तर घ्याल का?" मी म्हटले "होय." त्यांनी आठ दिवसांनी मला बोलविले. त्याच दिवशी कसबेकरांकडे गेले होते. त्यांनी दहा रुपये दिले व आईच्या श्राद्धानिमित्त दहा वार कापड दिले. ते म्हणाले, "तुमच्या मुलींना द्या." त्या भागात ठराविक दोनशे रुपये घेऊन परत आले. नंतर आठ दिवसांनी राऊतबाईंकडून बादली घेऊन हिंगण्याला पोचती केली व पोच-पावती पाठविण्यास सांगितले. संस्थेची कळकळ असल्याबद्दल राऊतबाईंनी माझे कौतुक केले.

□ खारला वर्गणीला गेले होते. मजपाशी कोरी, ५ रु. व २ रु. इतकीच पुस्तके होती. एक रुपया व ५० पैशांची नव्हती. नवीन पुस्तके येण्यास बरेच दिवस होते. पण माझ्या बॅगमध्ये नेहमी जवळ पुस्तके असतच. १५ व्या रस्त्याला गेले. कोणी पंधरा, कोणी पाच दिले. एका नवीन घरी गेले. त्यांनी एक रुपया दिला. मी म्हटले, "मजजवळ एक रुपयाचे पुस्तक नाही. मी दोन रुपयाच्या पावतीवर तुमचे नाव घालते व पावती नंबर तुम्हाला सांगते." ते म्हणाले, "चालेल," मी तसे करून दुसऱ्या घरी गेले. हे गृहस्थ खोजा जातीचे होते. त्यांनी पण एक रुपया दिला. तेव्हा त्यांना ती दोन रुपयांची पावती दाखवून त्यांचे नाव त्याच पावतीवर घातले व पावती त्यांना दिली. पहिल्या गृहस्थांनी नंतर हिंगण्याला संस्थेकडे पावती नंबर कळवून सदर पावती पुस्तक शांताबाई परांजप्यांना दिले आहे काय अशी चौकशी केली. १५ दिवसांनी त्या गृहस्थांना संस्थेचे पत्र गेले की शांताबाई स्वयंसेविका असून नंबर बरोबर आहे. संस्थेकडून मलाही पत्र आले. त्या नंतर मी मुद्दाम पावती-पुस्तक नेऊन त्या गृस्थांना दाखविले व त्यांची खात्री केली. त्यांनी आनंदाने आणखी दोन रुपये दिले व म्हणाले, "शांताबाई वाईट वाटून घेऊ नका. हल्ली लबाड लोक येतात ना म्हणून मला शंका आली. आता दर वर्षी या बरे." त्यांचा पूर्ण विश्वास बसला व दर वर्षी मला ते पाच रुपये देऊ लागले.

□ एका वर्षी माझी भाऊबीज १०/१२ हजारांवर ९७ रुपये झाली होती. थैली अर्पण करायला हिंगण्याला पोचले होते. मला वाटले

शेकडा पुरा करावा. मी काकांच्या (भास्करराव कर्वे) मागे उभी राहून हळूच त्यांच्या हातात भाऊबीजेचे विनंतीपत्रक दिले. त्यानी वाचून मागे पाहिले ती मी. काका म्हणाले "काय पाहिजे ?" मी म्हटले, "आश्रमाला भाऊबीज द्या" काका हसले व म्हणाले, "किती पाहिजे ?" मी म्हटले "दोन रुपये," ते घेऊन मी अण्णांकडे गेले व त्यांना म्हणाले, "भाऊबीज द्या." शेकडा पूर्ण करायला एक रुपया हवा." अण्णांनी दोन रुपये दिले व म्हणाले, "शेकड्याला शेंडी फुटू दे." मग म्हणाले, "अग लबाडे ! माझ्याकडून भाऊबीज घेतलीस का ? आनंद आहे. गंगेतले पाणी गंगेत सोडलेस!" मी आनंदाने सर्व रक्कम देण्यास ऑफिसमध्ये गेले. शेकडा पूर्ण झाला. मला आनंद झाला.

□ एकदा ठाण्याला वर्गणीला गेले होते. एका कीर्तनकारांच्या घरी गेले. येण्याचा हेतू सांगताच ते म्हणाले, "ही सारी लबाडी आहे. तुम्ही पैसे खाता. मी काही देत नाही." त्यांनी मला दोन चार शेलक्या शिव्या दिल्या. ते ऐकून मी येते म्हणून नमस्कार केला व पुढे गेले. त्यांनी मला बरेच वेळा पाहिले असावे. पुढे एकदा त्यांच्या कीर्तनाला गेले. एका देवळात त्यांचे कीर्तन होते. कीर्तन उत्तम केले. तुकारामांचे आख्यान होते, त्यात उदारपणाची उदाहरणे दिली. कीर्तन संपल्यावर आरती फिरली, त्यात कोणी कोणी पैसे टाकले. आरती बुवांच्या समोर ठेवली. त्यांचे माझ्याकडे लक्ष गेले. त्यांनी शेजारच्या माणसाला माझ्याकडे बोट दाखवून म्हटले, "त्या बाईंना इकडे बोलवा. माझे काम आहे. निरोपासरशी मी भीत भीतच गेले." कीर्तनकार म्हणाले, "या आरतीत पैसे आहेत ते तुम्ही भाऊबीज म्हणून घ्या." मला नवलच वाटले. रु. १-९५ भरले. मी दोन रुपयांची पावती दिली. ते म्हणाले, "पाच पैसे कमी आहेत." मी म्हटले, "मी घालीन" त्यांनी ओशाळल्या चेहऱ्याने पावती घेतली. मी नेहमी माझ्या पोतडीत भाऊबीज पुस्तके ठेवते, त्याचा फायदा झाला. मी नमस्कार करून निघाले. मनात म्हटले "अजब नमुना !"

□ विष्णुप्रसादमध्ये एका बाईंनी पाच रुपये भाऊबीज दिली व विचारले, "एखादे जुने पातळ दिले तर गरीब मुलीला होईल. न्याल का? बोहारणीला दिले तर इटुकले भांडे देईल. मुलगी चार दिवस नेसेल."

मी म्हटले, "अवश्य नेईन पण आपले नाव मात्र रिपोर्टीत येणार नाही" त्या म्हणाल्या, "मी नावाकरिता देत नाही. पण असा बोजा तुम्ही नेणार कशा?" मी सांगितले, "दर वर्षी अशी नेते. त्यात श्रम कसले?" त्यांनी चार जुनी धड पातळे दाखविली. एक परकर दाखविला. ती सर्व एका पिशवीत घालून मजकडे दिली. "तुमची तळमळ पाहून धन्यता वाटते. मी अल्पशी भेट दरवर्षी देत जाईन." त्याप्रमाणे मी दरवर्षी त्यांच्याकडे जाते.

☐ नेहमी भाऊबीज देणाऱ्या मंडळींच्या शेजारी श्रीमंत मंडळी रहात होती, तेथे जाण्यास एका माणसाने सुचविले. त्याप्रमाणे मी गेले. दार उघडले. ते श्रीमंत गृहस्थ म्हणाले, "कोण तुम्ही?" मी म्हटले," मी भाऊबीज मागायला आले आहे." "आम्ही भाऊबीज जाणत नाही." कोण कुठले कर्वे? त्यांना कोणी आश्रम काढायला सांगितले? माझ्यापाशी काही नाही. आल्यात तशा जा! टाटा, बिर्ला अशा लोकांकडे भीक मागा. "ठीक जाते." असे म्हणून निघाले. दार लागले. आतून शिव्यांचा मारा चालला होता. मला वाटले गरीब लोक परवडले! मोठ्यांकडे साधली तर उडी, नाहीतर बुडी. मी शिव्यांची ओवाळणी घेऊन खिन्न मनाने परतले.

☐ एक चणे विकणारा रोज येत असे. एक दिवस चणे घ्यायला त्याला बोलावला. त्याने एका पुस्तकातला कागद काढला व त्यात चणे देऊ लागला. मी कागद पाहिला, त्यावर अण्णांचा फोटो होता. मी म्हटले,"तो कागद मला दे. चुरगळू नको." त्याने विचारले," कशाला?" "अरे हा थोर माणसाचा फोटो आहे." त्यांनी काढलेल्या आश्रमात मी शिकले. गरीब मुली, विधवा शिकतात. त्या शाळेकरिता मी भाऊबीज मिळविते. तू देतोस का एक रुपया? "त्याने आनंदाने एक रुपया दिला. मी पावती दिली. तो म्हणाला, "पावती कशाला? गरिबांचा एक रुपया घ्या. कमी नाही ना वाटत?" मी म्हटले, "या रुपयाची किंमत शंभर रुपये आहे. तू मागताच दिल्याबद्दल मला आनंद झाला." तो मला नमस्कार करून गेला. केवढे हे मोठे मन!

☐ एका चांगल्या वस्तीत वर्गणीला गेले होते. दोन इमारतीत फिरले. बहुतेकांनी ऐपतीप्रमाणे भाऊबीज दिली. नंतर एका बाजूच्या

इमारतीत गेले. बेल वाजविली. बाईंनी दार उघडले. आत अलिशान देखावा पाहिला. मला वाटले चांगली मदत मिळेल. मला पाहून बाई जरा वचकल्याच असे दिसले. त्या म्हणाल्या, " आपण इथं कशा आल्यात ?" मी म्हटले, " वर्गणीला." बाई म्हणाल्या," मी वेश्या आहे. तुम्ही घरंदाज दिसता, कोणी पाहिलं तर वाईट." तेव्हा मी पण घाबरले. त्यांनी आपली करुण कहाणी सांगितली. ती ऐकून वाईट वाटले. त्या म्हणाल्या, " हा एक रुपया घ्या व लवकर जा. वरती पण जाऊ नका," मी झटकन् पावती देऊन निसटले. आता त्या इमारतीकडे पाहात देखील नाही.

□ मी भारतदर्शनमधून यात्रेला गेले होते. पितृगयेस श्राद्ध केले प्रथम फाल्गु नदीत स्नान करून वर गेले, १० जण श्राद्ध विधीस बसलो, यथासांग विधी झाला. भटजींना बरी प्राप्ती झाली. नंतर जेवण झाले. गप्पा चालू झाल्या. मी भटजींना म्हटले, "मी आपल्याकडे मागणे मागणार आहे." ते खुशीने म्हणाले, " मागा मागणे." मी पावती पुस्तक पुढे केले, ते म्हणाले, " किती देऊ?" मी म्हटले, " दहा रुपये तरी द्यावे," भटजींनी दहा रुपये स्वखुशीने दिले. पावती दिली. त्यांना माझ्या समयसूचकतेचा आनंद झाला. सर्व यात्रेकरू म्हणाले, "कमाल शांताबाई. तुम्ही दर वर्षी किती भाऊबीज जमविता?" "पंधरा वीस हजार होतात." "शाब्बास" "याकरिताच माझी नेहमी पायपीट चालू असते." मी थोडक्यात माझी कहाणी सांगितली. तेव्हा प्रत्येकीने ऐपतीप्रमाणे वर्गणी दिली. शंभर रुपये जमले. मला आनंद झाला. बाया कर्वेप्रमाणे मला वर्गणीचे वेडच लागले आहे.

□ एक दिवस काही कामाकरिता मी पारल्याला गेले होते. परत बोरीवलीला यायला निघाले. बाजारात भाजी घेत होते. इतक्यात एक वृद्ध गृहस्थ मला म्हणाले, " नमस्कार." त्यांनी दोन–तीन वेळा म्हटले पण माझे लक्षच नव्हते त्यांच्याकडे. पुन्हा ते मला हलवून म्हणाले, " हिंगणे ना?" मी म्हटले, "मी शांताबाई परांजपे" यावर म्हणाले, " हिंगणे व आपण समीकरणच आहे. खूप दिवसांनी भेट झाली. आनंद झाला. हे दोन रुपये भाऊबीज घ्या." मी थक्कच झाले. मी बॅगेतले पावती-पुस्तक काढून पावती दिली व नाव विचारले. ते म्हणाले, " नाव आजोबा घाला. पत्ता सांगत नाही." हा प्रकार लोक पहातच होते. मी

त्यांचे आभार मानून गाडीला गेले. हा संस्थेचा आदर ! ते आजोबा माझ्या डोळापुढे आहेत ! प्रथम वाटले कोणी भ्रमिष्ट माणूस असावा पण ते तसे नव्हते. मी मात्र त्याना शेवटपर्यंत ओळखले नाही.

☐ भारतदर्शनमधून मराठवाडा यात्रेला गेले होते. ६० यात्रेकरू होते. आम्ही पहात पहात वाटेत भीमाशंकरला गेलो. पूजा वगैरे आटपून बसलो. इतक्यात देवदर्शनाला एक गृहस्थ आले. तेही देवदर्शन घेऊन बसले. त्यांचे माझ्याकडे लक्ष गेले. ते म्हणाले, "शांताबाई, आज अलभ्य लाभ झाला ! तुम्ही भेटलात, आपण नेपाळला एकत्र होतो आठवते का ?" मी म्हटले, "आले ध्यानी," मग जरा गप्पा झाल्या. त्यांनी आपण होऊन मला पाच रुपये भाऊबीज दिली. न मागता दिल्याचे मला कौतुक वाटले. माझ्या पायपिटीचा असा फायदा झाला!

☐ एकदा मी पालघरला वर्गणीला गेले. गावाची माहिती नव्हती. पोस्टमनला विचारून एका घरी गेले व विनंतीपत्रक दिले. ते पत्रक वाचून ते गृहस्थ रागाने म्हणाले, "कोणी सांगितले माझे नाव !" मी म्हटले, "मीच आले" "बरे आता आल्यात तशाच चालत्या व्हा. भोंदू कुठल्या." मी वाईट तोंड करून खाली उतरले. एका हॉटेलात चहा घेतला व कॅशियरच्या पुढे विनंतीपत्रक ठेवले. ते वाचून त्यांनी पाच रुपये दिले व म्हणाले, "पुढील वर्षी या बरं का" नंतर पुढे गेले. त्यांचे आडनाव दांडेकर होते. घरमालकीण फार चांगल्या होत्या. त्यांनी आत बसवून घेतले व सर्व विचारपूस केली. त्या बाई म्हणाल्या, "आज माझ्याकडे रहा. मी नावे देते त्या त्या घरी जा. काही काळजी करू नका." मी गावात फिरले. बरीच भाऊबीज मिळाली. मला आनंद झाला. मी त्यांच्याकडे जेवले व झोपले. पहाटेची गाडी होती. त्यांनी मला उठविले. चहा दिला. स्वत: मला गाडीत बसवायला आल्या. मी त्यांचे मनापासून आभार मानले. गाडी सुटली. मला त्या बाईंचे अतोनात कौतुक वाटले. केवढे त्यांचे थोर मन. पुढे मी दरवर्षी त्यांच्याकडे जाऊन वर्गणी गोळा करू लागले.

☐ मी एकदा भाजी-बाजारात गेले होते. भाजी घेत घेत जात असताना एक पुडी पायाखाली आली मी उचलली. सोडून पहाते तो आत दोन रुपये व देवाचे चित्र होते. आजूबाजूला विचारले पण

कोणाची पुडी हे कोणीच सांगेना. तेव्हा देवानेच भाऊबीज दिली असे समजून मी एक पावती फाडली व पावतीवर देवबाप्पा असे नाव लिहिले. पावती एका मुलाला खेळायला दिली. घरी गेल्यावर ही गंमत सांगितली. घरातली मंडळी म्हणाली, " देवाने नकळत तुला भाऊबीज दिली. छान झालं. तुला जिथं तिथं भाऊबीज दिसते ना त्याचं हे फळ. पायपीट चालू दे."

□ एकदा दादरला भाऊबीजेला गेले होते. एक बिल्डिंग झाली तेव्हा एक बाई म्हणाल्या, "या समोरच्या बड्या लोकांच्या बिल्डिंगमध्ये जा. चांगले पैसे मिळतील." मी त्याप्रमाणे गेले. एकदम ६ व्या मजल्यापासून सुरुवात केली. बेल वाजवल्यावर दार उघडले. मी म्हटले, "कर्व्यांच्या शाळेला मदत मागायला आले आहे, आपल्या इच्छेप्रमाणे द्या." त्या बाईंनी खाड्कन दार लावले. त्या दारात माझे बोट चिरडले. मी ओरडले, "माझे बोट चिरडले." बाईंनी पुन्हा दार उघडले व म्हणाल्या, "दारात हात कशाला घातलात ? जा." औषध लावण्याचे सौजन्य पण दाखविले नाही. मनात म्हटले माणुसकी नाही. नंतर दुसरीकडे गेले व काय काम आहे ते सांगितले. ती बाई म्हणाली, "आम्ही आमच्या ज्ञातिफंडाला देतो. इतरांना नाही देत." असे म्हणून ती बाई काठी घेऊन मागे लागली. मी खाली गेले. पायपीट फुकट गेली. मनात आले मोठे तितके खोटे.

□ अंधांसाठी काम करणारे श्री. हातिरकर व श्री. पाटील ह्यांना माझ्या कामगिरीचा सुगावा लागला आणि अचानक ते माझ्याकडे भाऊबीजेच्या दिवशी आले. "काय हो ताई तुम्ही एवढे मोठे कार्य करता आणि आम्हाला कशी बातमी नाही ? तुमची संस्थेची तळमळ बघून आम्ही आलो." त्या दोघांनी मिळून मला दहा रुपये दिले. त्यांना वाटणारी संस्थेची आपुलकी याप्रमाणे दिसून आली.

□ मंत्री नावाच्या बाई दरवर्षी आपल्या सासुबाईंकडे दादरला भाऊबीज पाठवतात तेथून मी नेते. तशी या वर्षीही गेले. मला पाहून सासुबाई म्हणाल्या, " कालच तुमची आठवण काढली. यंदा सूनबाईंनी एकशे एक रुपये पाठविले आहेत, कारण आपल्या संस्थेला ८० वर्षे पूर्ण होणार ना ? म्हणून मी पण एकशे एक रुपये देते." त्यांचा उदारपणा

पाहून मला नवल वाटले. सासुबाई म्हणाल्या "मला एकच वंशाचा दिवा (नातू) आहे. त्याला चांगला आशीर्वाद द्या." मी आशीर्वाद देऊन पावत्या दिल्या. ~

☐ अशीच मी एका चाळीत गेले. त्या चाळीतल्या बिऱ्हाडकरूंनी आपापल्या ऐपतीप्रमाणे भाऊबीज दिली. बिऱ्हाडे हिंदूंची होती. एकच मुसलमान होते. मी त्यांच्याकडे गेले, तेव्हा त्यांनी संस्थेबद्दल चौकशी करून मी चांगली उत्तरे दिल्याबद्दल व संस्थेचे कार्य आवडल्याबद्दल पाच रुपये दिले. मला त्यांचे कौतुक वाटले. मी आभार मानले. ~

☐ मी एका ठिकाणी वर्गणी मागायला गेले. तेथील गृहस्थ म्हणाले "आमच्या जवळ पैसे नाहीत तांदूळ घ्याल का ? तुमच्या जवळ कुठल्या पावत्या आहेत ?" त्या दाखविल्यावर त्यांनी दोन रुपयांचे तांदूळ दिले. मी त्यांना दोन रुपयांची पावती दिली. नंतर मी घरी येऊन ते तांदूळ मोलकरणीला विकले. इच्छा असली की मनुष्य कोणत्याही रुपाने देतो हे दिसून आले. ~

☐ एका बँकेच्या कॉलनीत गेले. कुणी दिले कुणी दिले नाहीत. पण एका घरी मजेदार अनुभव आला. ते गृहस्थ म्हणाले, "कोण तुम्ही ? काय पाहिजे तुम्हाला ?" संस्थेची व माझी माहिती सांगितली. त्यावर ते म्हणाले, "दुसऱ्याला देणे हा शब्द माझ्या शब्दकोषात नाही. मी कधी कोणाला काही देत नाही. मी भाजी पण घेत नाही." तेव्हा मी विचारले, "तुम्ही खाता काय ?" "ते आमच्या बायकोला विचारा. सर्व त्यांच्याकडे असते." मी बायकोला भेटले. त्या म्हणाल्या, "ते कधी कोणाला पैसा देत नाहीत व मलाही देऊ देत नाहीत. तुम्ही जा. जास्त बोलू नका." मला नंतर कळले की हे गृहस्थ बँकेचे मॅनेजर होते. तेव्हा सांगायचे म्हणजे कुठे तांदूळ देणारे ते गृहस्थ आणि कुठे दिडकीही न देणारे हे गृहस्थ ! ~

☐ मी अशीच वर्गणी मागायला गेले होते. तिथे ५/६ मुले बाहेर आली. त्यांनी माझी चेष्टा करून उडवून लावण्यास सुरुवात केली. पण त्यात एक मुलगा चांगला होता. त्याने माझी माहिती ऐकून घेतली व सर्वांचे मन वळविले. त्याने स्वत: दोन रुपये दिले व इतरांकडून एक एक रुपया घेतला. मी विचारले, "सर्वांची मिळून एकच पावती करू

की प्रत्येकाला वेगळी देऊ ?" त्यांनी सांगितल्याप्रमाणे कोऱ्या पावत्यातली एकच पावती केली. त्यांनी आपली चूक कबूल करून माझ्या पाया पडले व पुढील वर्षी पुन्हा यायला सांगितले.

☐ मी वर्गणी गोळा करायला पहाटे ६ वाजता निघाले. गाडीत बसले होते. दोन गृहस्थ माझ्यासमोर बसले होते. ते बराच वेळ माझ्याकडे बघत होते. धीर धरून मला म्हणाले, "आपण शांताबाई परांजपे का ?" मी मानेनेच हो म्हटले. ते म्हणाले, "महाराष्ट्र टाइम्समध्ये तुमचा परिचय वाचला. आपण त्या कामाकरिताच निघालात का ?" मी "हो" म्हटले. त्यावर त्यांनी दोन-दोन रुपये काढून दिले व मी पावत्या दिल्या. नाव विचारले, पहिला म्हणाला पारशी बाबा, दुसरा म्हणाला हरिदास. माझी नुसती माहिती वाचून आपण होऊन वर्गणी दिल्याबद्दल मला त्यांचे कौतुक वाटले.

☐ एका घरी गेले. बाईंनी दार उघडले. यजमान घरी होते. ते म्हणाले "तुमच्याजवळ काय आहे ?" "हिंगण्याची पावतीपुस्तके आहेत." "आणखी काय आहे ?" "माहिती पत्रक आहे." जोराने आवाज करून विचारले, "आणखी काय आहे ?" मी म्हटले "अधिकारपत्र आहे." त्यावर ते दरडावून म्हणाले, "फोटो कुठे आहे ? फोटो पाहिजे तुमचा !" मी उत्तर दिले, "फोटो नाही. मी तुमच्यासमोर उभी आहे. हाच माझा फोटो. तुम्ही चौकशी करा हवी तर हिंगण्याला." त्यावर ते म्हणाले, "मला नाही वेळ पत्र पाठवायला." मी त्यांना नमस्कार करून मुकाट्याने जिना उतरून खाली आले. त्या बिल्डिंगमधल्या सर्व लोकांनी मला पैसे दिले.

☐ अशीच एका सोसायटीत गेले. तेथील मुलगी मला लहानपणापासून पाहात होती. तिचे लग्न होऊन ती आता सासरी त्या घरी आलेली होती. तिने ओळख दाखविली नाही. उलट म्हणाली "काही मिळणार नाही." इतक्यात तिचे यजमान आले व म्हणाले. "या शांताबाई, बसा," ती आत निघून गेली. "घ्या पावती पुस्तक, हे घ्या पाच रुपये." मग त्यांच्या मनात काय आले ते म्हणाले, "हे घ्या पाच रुपये. हे आणखी पाच रुपये" एकूण पंधरा रुपये दिले. मला नमस्कार करून म्हणाले, "दरवर्षी या." हा दोहोतला फरक !

□ एका ब्लॉकची बेल वाजविली. बाईंनी दार उघडले. बाहेर धोबी उभा होता. "या शांताबाई" त्या बाईंनी पाच रुपये दिले. धोब्याने विचारले "या कोण ?" "कर्व्यांच्या विद्यार्थी आहेत. दरवर्षी येतात त्या." त्या धोब्याला काय वाटले कुणास ठाऊक. त्याने दोन रुपये दिले. तो म्हणाला, "मी गरीब आहे. माझी भाऊबीज घ्या." मी म्हटले, "एक रुपया दिला तरी चालेल. नाही दिली तरी चालेल." पण तो ऐकेना. मी पावती दिली. तो म्हणाला, "पावती नको. तुमच्यावर विश्वास आहे." कौतुकाने त्याला शाबासकी देऊन दुसऱ्या घरी गेले.

□ एका मोठ्या सोसायटीत गेले. त्या लोकांनी मला प्रतिसाद चांगलाच दिला. एका घरी गेले. त्या बाईंनी आत बोलावून दरवर्षी-प्रमाणे अकरा रुपये दिले. इतक्यात यजमान आले. बाईंनी माझी ओळख करून दिली. ते म्हणाले, "तुम्ही मोठ्या कंपनीतून जात नाही का ?" त्यांना मी मागचा अनुभव सांगितला. त्यांना वाईट वाटले. ते म्हणाले, "तुमचा झालेला अपमान मी भरून काढतो." आणि त्यांनी मला १०१ रु. दिले. "दरवर्षी येत जा" म्हणून सांगून मला नमस्कार केला व निघून गेले. तेव्हापासून त्यांच्याकडून मला एकशे एक रुपये मिळतात.

□ बोरिवली श्रीकृष्णनगर सोसायटीत सामंत यांच्या घरी गेले. त्यांनी दसरा फंड रु. ५१ अशी चिठ्ठी लिहून ठेवली व शांताबाईंना वर्गणी दे असे बायकोला सांगून ठेवले होते. पत्नीने ते एक्कावन्न रुपये व स्वतःचे आणखी दहा असे एकसष्ट दिले. संस्थेवरच्या प्रेमाचे हे नमुने पाहून मन भरून येते.

□ गिरगावात शास्त्री हॉलमध्ये गेले. एक मुलगा लहानपणापासून मला पाहतो. लांबूनच मला पाहून म्हणाला, "काय आजी, आमच्याकडे वर्गणीला आलात ? तुम्ही नाही मला ओळखलं ? "मी राजू" मी हो म्हटले, तो मला त्याच्या घरी घेऊन गेला व आईला म्हणाला, "या आजींना वर्गणी दे." आईने वर्गणी दिली व मी पावती दिली. हा राजू आता मॅट्रिकला आहे. त्याने इतकी ओळख ठेवली. त्याचे कौतुक करण्यासारखे आहे.

□ पहिलीत असतानाची माझी विद्यार्थिनी गाडीत भेटली. तिला मी फ्रॉकमध्ये एवढीशी पाहिलेली. आता मोठी साडी नेसलेली बाई

कशी ओळखणार? "नाही ओळखत?" तिने विचारले. मी नाही म्हटल्यावर म्हणाली "मी ढेरे" तिच्या बरोबर दोन मुले होती. ती कोणाची म्हणून मी चौकशी केली. तिने उत्तर दिले. "माझी. राजू आणि संजू. तुम्ही अजून भाऊबीजेचं काम करता?" मी हो म्हटल्यावर तिने पाच रुपये दिले व आपला पत्ता देऊन दर वर्षी यायला सांगितले. आपल्या बाईंवर केवढे प्रेम !

□ दादरला चौधरी नावाचे एक वकील आहेत. ते प्रथम आठ आणे भाऊबीज देत असत. ते मला आईप्रमाणे मान देत. पुढे रुपया, दोन रुपये. पाच रुपये देऊ लागले. पुढे वीस रुपये देऊ लागले. ते म्हणाले, "आपल्या आशीर्वादाने चांगले चालले आहे. यंदा मी शंभर रुपये देणार आहे. पावती आहे का?" मी म्हटले, "किती द्याल तेवढा आकडा घालीन, कारण पावती कोरी केली आहे" त्यांनी पावती पुस्तक पाहिले व समाधान झाले. लगेच त्यांनी १०१ रुपयांचा आकडा घातला. गरीब मुलीकरिता मी एक वार कापड मागितले. ते म्हणाले, "शांताबाई, हे कापड गोळा करण्याचे काम करता का? छान! मान अपमान होईल याची खंत न करता कार्य करता. अशा आश्रमकन्या लाभल्यावर संस्थेला काय कमी!" मी म्हटले. बाया कर्वेने मला धडा दिला आहे. अण्णांचा आशीर्वाद व आपल्यासारखे उदार दाते लाभल्यावर संस्थेला कधीच कमी पडणार नाही." त्यावर ते म्हणाले, "माझी फार स्तुती करता. हे आमचे कर्तव्यच आहे." मला चहा वगैरे देऊन उभयतांनी मला निरोप दिला. त्यांचा केवढा उदारपणा!

□ मी बाजारात भाजी घ्यायला जात होते. इतक्यात एका माणसाने मला थांबवून माझ्या पायावर डोके ठेवून नमस्कार केला. मी अवाक् झाले. तो म्हणाला, "तुम्ही मला ओळखले नाही. तुमच्या पहिलीच्या वर्गात होतो. आता मॅट्रिक होऊन या बेडेकरांच्या दुकानात आहे, महागाईसकट तीनशे रुपये मिळतात. माझे लग्न झाले आहे. एक मुलगा आहे. बायकोने खाणावळी ठेवले आहेत. तिचा पैसा घरखर्च भागवतो. थोडा माझा पगार शिल्लक ठेवतो. तुम्हीच आम्हाला महर्षि कर्वे यांचा फोटो दाखवून ते माझे वडील म्हणून सांगितले होते. त्यांची काटकसरही सांगितली होती. तशी थोडीशी मी करतो. बरं, बाई आता

भाऊबीजेचे काम करता का?" मी म्हटले, "होय." "पुस्तक आहे का?" मी म्हटले, "का रे?" त्यावर तो म्हणाला, "आपल्या विद्यार्थ्यांचे पाच रुपये घ्या." मी पावती दिली. तो नागेश सुतार मला ३० वर्षांनी भेटला. त्याला खूपच आनंद झाला व त्याला मनापासून आशीर्वाद दिला. त्याने इतकी ओळख ठेवल्याचे खूपच कौतुक वाटले

□ एका सोसायटीत दारावरची घंटा वाजवली. मालकीणबाईंनी दार उघडून मला बसवून घेतले व चहा दिला. नंतर एक नऊवारी साडी व दहा रुपये दिले. "एका गरीब मुलीला साडी द्या." मी सांगितले, "पण साडीचा उल्लेख अहवालात येणार नाही." त्या म्हणाल्या, "मी नावासाठी दिली नाही. दर वर्षी देईन." नंतर त्यांनी माझा फोटो घेतला व म्हणाल्या "आदर्श बाईंचा फोटो संग्रही असावा" मला नवल वाटले. आभार मानून पुढे गेले.

□ दादरला एका सोसायटीत गेले होते ६–७ जणांनी आपल्या ऐपतीप्रमाणे भाऊबीज दिली. पुढे एका खोलीजवळ गेले व म्हटले, "मी भाऊबीज भेट मागायला आले आहे. आपण द्याल ते घेईन." ते गृहस्थ म्हणाले, "मला काही द्यायचे नाही. ही सारी फसवेगिरी आहे. माझा तुमच्यावर विश्वास नाही. अशा संस्था पैसेखाऊच असतात." मी म्हटले, "असतील कदाचित. परंतु आमची संस्था नाही हे मी छाती–ठोकपणे सांगते." त्यावर ते गृहस्थ म्हणाले, "आमच्या भागात कधीच यायचे नाही. आलात तर मार खाल." मी म्हटले "बाहेर पाटी लावलीत तर बरं होईल. म्हणजे कोणीच येणार नाहीत." मी अपमानीत होऊन जड मनाने बाहेर पडले. पुन्हा त्या भागात कधी गेले नाही.

□ आमच्या शेजारी दिक्षित नावाचे कुटुंब राहते. त्यांना एक मुलगी १६ वर्षांची व दुसरी १० वर्षांची होती. मुलगा नाही म्हणून उभयता कष्टी असत. मी त्यांची समजूत काढीत असे. एकदा मी सहज म्हणाले, "दिक्षित जर तुम्हाला मुलगा झाला तर हिंगणे संस्थेला भाऊबीज काय द्याल? त्यावर ते म्हणाले "तुमच्या आशीर्वादाने झाला तर ऐपतीप्रमाणे देईनच." योगायोगाने बाईंना दिवस गेले. नऊ महिने पूर्ण होत आले. त्यांची व माझी उत्सुकता वाढत होती. एका चांगल्या दिवशी प्रसूती झाली. मी त्यांच्याबरोबर

हॉस्पिटलमध्ये होतेच. नर्सबाईंना विचारले, "बर्फी का पेढा?" नर्सबाई म्हणाल्या, "पेढा." सर्वांना आनंद झाला. पुढे बारसे झाले. नाव 'निनाद' ठेवले. "आपल्या आशीर्वादाने मुलगा झाला" म्हणून दिक्षितांनी एक्कावन्न रुपये भाऊबीज दिली. "बोलाफुलाला गाठ पडली इतकेच." ते म्हणाले, "तुमच्या भाऊबीजेचा निनाद पसरो आमच्या निनादप्रमाणे." मी सर्वांना आशीर्वाद दिला.

☐ आमच्याकडे पत्र वाटणाऱ्या पोस्टमनला एकदा मी दिवाळीची बक्षिसी म्हणून दोन रुपये देऊ लागले, ते तो घेईना. त्याला माझ्याकडे येणाऱ्या पत्रांमुळे बरेच वेळा यावे लागे तेव्हा त्याने बक्षिसी घेण्याचे नाकारल्याने मी आश्चर्यचकित झाले. कारण इतर बरेच पोस्टमन कामाच्या बाबतीत टाळाटाळ करूनही नेहमी बक्षिसी मागून घेतात. त्याला कारण विचारले असता तो म्हणाला, "ताई, तुम्हाला हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेकडून नेहमी येणाऱ्या पत्रांवरून व पावती पुस्तकांच्या पार्सलांवरून तुम्ही त्या संस्थेचे फार मोठे कार्य करीत असता हे मला कळले आहे. तुम्ही रिटायर्ड आणि वयस्कर असूनही हे बहुमोल काम करीत असता. मी स्वत: प्रत्यक्षपणे तुम्हाला काही मदत करू शकत नाही. तेव्हा निदान तुमच्यासारख्याकडून बक्षिसी न घेण्याचे तरी मला करू द्या." त्याचे बोलणे ऐकून मला खूप आनंद झाला. अजूनही जगात अशी माणसे आहेत!

☐ २० डिसेंबर १९७८ ला थैली अर्पण करण्यासाठी मी हिंगण्याला आले होते. समारंभ झाल्यावर मोडक मास्तरांचा मुलगा (हा लहानपणी प्राथमिक शाळेत माझ्या वर्गात होता) भेटला. अमेरिकेतील मिचिगन युनिव्हर्सिटीतील पीटर हुक नावाच्या एका गृहस्थांना संस्था दाखवायला तो आला होता. मूळ झोपडीत चहाच्या वेळी माझी ओळख करून देऊन माझ्या भाऊबीजेच्या कामाची माहिती त्यांना सांगितली. माझी भाऊबीज तीन लाखांच्या जवळपास आल्याचे त्यांना सांगितले. त्या गृहस्थांना मराठी चांगले समजत होते. त्यामुळे ते माझ्याशी मराठीत बोलले व त्यांनी जाताना एक कागद घडी करून माझ्या हातात दिला. त्या कागदात ५१ रुपये होते व 'श्रीमती शांताबाई परांजपे यांना

भाऊबीजेला सादर समर्पित' असे लिहिले होते. त्यांची संस्थेचे कार्य जाणून घेण्याची उत्सुकता व औदार्य यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच. ☙

☐ मी यात्रेला जाताना भाऊबीजेची २/४ पुस्तके बरोबर नेते व माझ्या बरोबर यात्रेला आलेल्या मंडळींकडून भाऊबीज घेते. एकदा आम्ही सर्व मंडळी खरेदीला गेलो होतो. मी पण अंशतः खरेदी केली. नंतर दुकानदारापुढे भाऊबीजेचे पुस्तक केले. तो काश्मिरी ब्राह्मण होता. म्हणाला, "मला अण्णा कर्वे माहीत आहेत. मी तुमच्या बोरिवलीला येतो. बोला किती भाऊबीज पाहिजे." मी म्हटले, "आपल्या इच्छेप्रमाणे द्या." त्याने दहा रुपये दिले व आपल्या बहिणीचे दोन दिले. त्याने माझी सर्व माहिती विचारून घेतली. ते पाहून आमचे सहप्रवासी म्हणाले, "शांताबाई, तुमचे कार्य व चिकाटी पाहून आणि तुमच्या वयाकडे पाहून तुमचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. असे कार्य प्रत्येक विद्यार्थिनीने केले तर संस्थेला काहीच कमी पडणार नाही." ☙

☐ एका घरी आईने पाच रुपये दिले व मुलाला विचारले, "विनायक, ह्या शांताबाई भाऊबीजेला आल्या आहेत. तू देणार का!" तो म्हणाला, "तू मला फटाके दिले नाहीस ना त्या फटाक्यांचे दोन रुपये त्यांना दे." मला त्याचे कौतुक वाटले व आशीर्वाद देऊन मी निघाले. तो माझ्याबरोबर चार ओळखीची घरे दाखवायला पण आला. ☙

☐ मी शारदाश्रमात बहुधा गणपतीच्या दिवसांत जाते. यंदा ऑक्टोबर आला तरी न गेल्याने श्री. खंडागळेकर यांनी मी बरे नसल्यामुळे आले नसावे म्हणून दहा रुपये मनीऑर्डरने हिंगण्यास पाठविले व कळकळीने माझ्या प्रकृतीची चौकशी केली. संस्थेने त्यांच्याकडे पावती पाठवताना माझी प्रकृती चांगली असल्याचे कळविले व त्यांना पाठविलेल्या पत्राची प्रत मला समजावे म्हणून माझ्याकडे पाठविली. मला फार नवल वाटले. दुसऱ्या दिवशी मुद्दाम शारदाश्रमात गेले. मला पाहून ते म्हणाले, "माझ्या भगिनी बऱ्या आहेत ना ?" मी म्हटले, "यंदा काश्मीर सहलीला गेल्यामुळे मला यायला वेळ झाला." मग चहा, गप्पा झाल्या व त्यांनी पुन्हा पाच रुपये दिले. मी म्हटले, "तुम्ही दहा रुपये पाठविले ना ? आणखी नकोत." ते म्हणाले, "शांताबाई,

तुमचे चांगले काम पाहून मी आनंदाने दिले आहेत. त्याचा स्वीकार करा." मी पावती दिली व गोड निरोप घेऊन निघाले.

☐ एका घरी गेले असता मुलाने दहा रुपये भाऊबीज दिली. तोच त्याचे वडील आले. मला म्हणाले, "आज किती वर्षे भाऊबीज देतो मी ?" मी म्हटले "जवळ जवळ ३० वर्षे देता." त्यावर ते रागाने म्हणाले, "३० वर्षांची पाच रुपयेप्रमाणे किती भाऊबीज झाली ?" मी म्हटले, "दीडशे रुपये." "इतके वर्षांत मला संस्थेचा अहवाल का येत नाही ? संस्थेचे काम, तिथला कारभार कसा काय चालला आहे ते मला कसे कळणार ?" मी म्हटले, "छपाईचा खर्च खूप वाढल्याने हल्ली पाच रुपये देणाराला अहवाल पाठवीत नाहीत. फक्त दिवाळीचे कार्ड पाठवतात." त्यावर ते म्हणाले, "मला अहवाल पाहिजे. काय संस्थेमध्ये खाबूगिरी असेल." मी म्हटले, "तसे अजूनपर्यंत कधीच झाले नाही. आमचा कारभार चोख असतो." त्यांची समजूत घालताना माझी पुरेवाट झाली. ते म्हणाले, "३० वर्षांची भाऊबीज रु. १५० झाली, त्याच्या व्याजातून मला अहवाल आलाच पाहिजे." मी म्हटले, "भाऊबीज त्याच्या त्याच वर्षी मुलींच्या खर्चाकरिता खर्ची पडते. साठवून ठेवीत नाहीत. पण तुम्हाला हवाच असला तर पुढच्या वर्षी अहवाल पाठवायला सांगेन." त्यांच्या त्या विचित्र बोलण्याचा मुलाला पण राग आला. त्याने मला खूण करून जायला सांगितले. दाराशी येऊन मुलगा म्हणाला, "तुम्ही पण बाबांना चांगली समर्पक उत्तरे दिलीत. या, मनाला वाईट वाटून घेऊ नका. ते जरा तापट आहेत." त्यांचा निरोप घेऊन मी निघाले.

☐ एकदा एका चांगल्या सोसायटीत गेले. सर्वांनी चांगली भाऊबीज दिली. शेवटच्या बिल्डिंगमध्ये गेले. बेल वाजविली. दार उघडून एक दाढीवाला तरुण मुलगा बाहेर आला व म्हणाला, "क्या बात है !" त्याचे कपडे फाटके होते, मी म्हटले "भाऊबीज मागायला आले आहे." तो तरुण ओरडला, "इथे सर्व बेवडे आहेत." त्याचा तो आवाज ऐकून मी समोरच्या ब्लॉकमध्ये गेले. मी फारच घाबरले होते. समोरच्या माणसाजवळ चौकशी केली तेव्हा कळले ते खरोखरच बेवडे आहेत. "आम्हाला दार उघडायला भीती वाटते. घरात एकच मुलगा नोकरी

करतो. एकूण ७ माणसे. आई, वडील, बहीण, चार भाऊ, सर्वांनी नोकऱ्या सोडल्या आहेत. एक महिन्यात ८० हजार रुपये उडविले." मला फार वाईट वाटले. थोड्या वेळाने बहीण बाहेर आली. खूप रडली. जवळ लहान भाचा होता. त्याला दूध नसल्याने सारखा रडत होता. मी एक रुपया दिला व दूध आणवून त्या बाळाला दिले. बाळ हसला. मला एकच प्याला नाटकाची आठवण झाली. नंतर मी पुढे गेले. केवढे दारूचे परिणाम; घरदाराची धूळधाण !

☐ माटुंग्याला एका सोसायटीत गेले. बेल वाजविली. फडकेबाईंनी दार उघडले व आदराने म्हणाल्या, "या शांताबाई." त्यांनी पाच रुपये दिले. इतक्यात मुलगी आली व आईला म्हणाली, "मला यंदा नोकरी लागली ना? मी पंधरा रुपये भाऊबीज देऊ का?" आई म्हणाली, "खुशाल दे." मग तिने पंधरा रुपये दिले व पेढा देऊन तोंड गोड केले. मला त्या मुलीचे कौतुक वाटले. "ही पुढे दानशूर होईल." असा आशीर्वाद दिला, व पुढे निघाले. "पुढच्या वर्षी जास्त देईन बरं का. नमस्ते." ती म्हणाली.

☐ एका दहा मजली इमारतीत गेले, सगळे बडे लोक आहेत. बराच लाभ होईल असे वाटले. त्या बिल्डिंगमध्ये एक दानशूर वकील मला बहीण मानतात. प्रथम त्यांच्याकडे ७ वाजता गेले. उभयतांनी माझे स्वागत केले. विचारले, "यंदा उशीर का झाला?" मी म्हटले, "यात्रेला गेले होते." गप्पा झाल्या, चहाचा कप आला. नंतर त्यांनी एकशे एक रुपये दिले. ते म्हणाले, "इथे फिरून पहा. बहुतेक देतील," त्याप्रमाणे मी फिरले, काहींनी दिले.

एका ब्लॉकची बेल वाजविली. गुजराथी बाई पुढे आल्या. त्यांनी आत बोलाविले व विचारपूस केली. जरा आश्चर्य वाटले. बऱ्याच गुजराथी मंडळींना संस्थेची माहिती नसते व ते वाटेला लावतात. या बाईंनी तसे न करता पाच रुपये दिले. पावती नको म्हणाल्या पण मी दिली. मग म्हणाल्या "थोडा नाश्ता करा." मी नको म्हटले तरी आग्रहाने ढोकळा व निरनिराळ्या प्रकारची लोणची पुढे आणून ठेवली व म्हणाल्या; "तुम्हाला आवडेल ते लोणचे घ्या." लोणची फारच चविष्ट होती व ढोकळा अगदी हलका होता. ते सर्व अमृततुल्य खाणे

खाऊन तृप्त होऊन निघाले. मला नमस्कार करून गोड निरोप देताना म्हणाल्या, "पुढच्या वर्षी जरूर या." मी उल्हसित झाले.

त्याच इमारतीत खालच्या मजल्यावर गेले. दार उघडे होते. एक गृहस्थ पुढे आले. "कोण तुम्ही ? वर सोसायटीत कुणी सोडले ?" ते मोठ्याने ओरडले. मी म्हटले, "मी कर्वे आश्रमाची भाऊबीज मागायला आले आहे. आपल्याला काही देता आल्यास द्या." मी नम्रतेने म्हटले. त्यांनी शिव्यांचा भडिमार सुरू केला व म्हणाले. "तुमच्या जवळ पुरावा काय आहे ?" अधिकार-पत्र, अहवाल, विनंती-पत्रक वगैरे त्यांना दाखविले. "संस्था रजिस्टर आहे का ?" मी म्हटले, "आहे." "दाखवा पाहू." ते पण दाखविले. तरी त्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी तो कागद फेकला आणि म्हणाले, "चालत्या व्हा." मी खालच्या मजल्यावर आले.

तिथे त्याच इमारतीतल्या एक बाई भेटल्या. त्या म्हणाल्या "आमची भाऊबीज घ्या पाच रुपये." मी जिन्यातच पावती दिली. त्यावर त्या बाईंनी विचारले, "झाले का सर्व फिरून ?." मला उत्तर देता येईना. एकदम रडूच कोसळले. त्या माझी समजूत घालीत होत्या तोच ते गृहस्थ धडाधडा खाली आले व आमचे दृश्य पाहून म्हणाले, "मीच बोललो. रडायला काय झाले ? ढोंगी बाई." तेव्हा त्या बाई म्हणाल्या, "मी जुन्या जागेत असल्यापासून ओळखते. त्या किती चांगले कार्य करतात ते मला माहीत आहे." परंतु ते गृहस्थ बडबडत निघून गेले. मला मात्र मनातल्या अपमानाची इंगळी डसतच होती. मनात आले नको तो अपमान. परंतु दुसऱ्या क्षणी मनात विचार आला, 'अण्णा, बायांनी अपमान सहन करूनच संस्था उभारली म्हणून मी शिकले आणि आज मानाने जगते आहे." असा विचार करून खाली परतत असताना विचार केला की त्या वकील साहेबांना भेटून सांगावी का ही हकीकत परंतु दुसरे मन म्हणाले, 'आपले दुःख आपणच सहन करावे,' मी वर न जाता जड मनाने घरी आले. जगात सगळे नमुने असतात. श्रीमंतीचा धूर असतो ना ! मनात खोल जखम झाली खरी. एकाच इमारतीत तीन अनुभव आले.

□ मी एकदा एका बँकेत भाऊबीजेसाठी गेले. मॅनेजरनी पाच

रुपये दिले. तिथे जवळ उभा असलेला शिपाई होता. तो म्हणाला, "कसले पैसे मागता ? पाहू तुमचे पावती पुस्तक." मी दिले. त्याने आपली एक पावती फाडली व दुसऱ्या शिपायाला म्हणाला, "घे एक पावती. आपले कर्वे स्त्री-शिक्षण देणारे आहेत ना ? त्यांच्या शाळेला मदत." त्याने पण एक पावती घेतली. मला ह्या दोघांचा उदारपणा पाहून कौतुक वाटले. मी त्यांना शाबासकी दिली. त्यांनी सलाम केला.

☐ आमच्या बाजारात एक चिक्कूवाला आहे. चिक्कू घ्यावयाचे झाले की मी त्याच्याकडेच घेते. एक दिवशी मी म्हटले, "आमच्या संस्थेला भाऊबीज देणार का?" तो म्हणाला, "किती मागतील?" मी म्हटले, "द्या एक रुपया." त्याने पाच रुपयाची नोट काढून दिली· मी त्याला चार रुपये परत देऊ लागले. परंतु तो म्हणाला, "बाईसाहेब मी आपल्या संस्थेला पाच रुपये दिले आहेत." त्याच्या धंद्याच्या मानाने खूपच दिले. मी निघाले. तो म्हणाला ,"ते कर्वे गेले." त्यावर त्याला फार वाईट वाटले. म्हणाला, " त्या संस्थेला नमस्कार सांगा " मी होय म्हटले व घरी आले. अशीच एका आंबेवालीने 'माझी गरिबाची एक रुपया भाऊबीज, मला दिली. गरीब माणसेही मनाने उदार असतात!'

☐ आमचा झाडूवाला म्हणाला, " बाईसाहेब, आपण रोज इतक्या लवकर कुठे जाता? नोकरीला?" मी म्हटले,"नाही रे. ज्या कर्व्यांच्या संस्थेत मी शिकले त्या संस्थेची भाऊबीज मागायला जाते." त्यावर तो म्हणाला, " तुम्हाला शिकायला खूप पैसे लागले असतील." मी सांगितले, "मी फुकट शिक्षण घेतलं. आता मला पेन्शन आहे. माझ्यावर संस्थेचे उपकार आहेत. ते जाणून मी हे काम करते." त्यावर झाडूवाल्याने एक रुपया दिला व म्हणाला, "माझी गरिबाची ही ओवाळणी घ्या," मला त्याचे खूपच कौतुक वाटले, केवढा हा मनाचा मोठेपणा! मी पावती दिली. तो सलाम करून गेला. मी त्याच्याकडे पाहातच उभी राहिले.

☐ मी खारला १४ व्या रस्त्यावर शेंडे नावाच्या गृहस्थाकडे गेले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे भाऊबीजेची पावती करून त्यांना दिली. पण गप्पांच्या नादात मी पैसे घ्यायला विसरले. मी रोज पैसे मोजीत नसल्याने माझ्या लक्षातही ती चूक आली नाही. परंतु त्या गृहस्थांच्या ध्यानात ती चूक आली. तेव्हा त्यांनी भाऊबीजेच्या पुस्तकावरचा पत्ता बघून संस्थेकडे मनीऑर्डर केली. व पावतीचा नंबर कळवून ही रक्कम शांताबाईंनी जमविलेल्या रकमेपैकी आहे असे कळविले. ही गोष्ट मी हिंगण्याला आल्यावर मला समजली व माझ्याकडून हिशोब करताना तेवढे पैसे कमी घेतले. ह्याबद्दल त्या गृहस्थांचे व कचेरीतील सौ. वर्वे यांचे आभार मानले पाहिजेत.

☐ १८ डिसेंबर १९७९ ला दादरला शेवटची अर्धवट पुस्तके खपवायला गेले. कारण २० तारखेला निधी समर्पणाचा समारंभ होता. पुस्तके भराभर खपली. एकच पाच रुपयांची पावती उरली. तेवढे स्वतःच घालायचे असे मी ठरविले व दादरच्या स्टेशनवर आले. बोरिवली गाडी लावलेली होती. इतक्यात एक जोडपे आपसात बोलत आले. 'आपल्याकडे भाऊबीज मागायला येतात त्याच शांताबाई दिसतात.' त्यांनी मला हाक मारली व विचारले,"तुम्ही आला नाहीत. हे घ्या पाच रुपये." मी चमकून पुस्तक बाहेर काढले. ते म्हणाले,"काही पावती नको, आमचा बिश्वास आहे तुमच्यावर. अगोदर गाडीत चढा बघू. त्यांचे आभार मानून मी गाडीत चढले मनात विचार आला, माझ्यावर प्रेम किती! कर्तव्यनिष्ठा! अतिशय कौतुक वाटले. गाडीतली गर्दी कमी झाल्यावर मी विचारले, "तुम्ही राहता कुठे?" "बोरिवलीला श्रीकृष्ण सोसायटीत. तुम्ही दरवर्षी माझ्याकडे येता. तुमच्या लक्षात नाही का?" त्यांनी विचारले. "हल्ली जरा विस्मरण होते." "यंदा आकडा किती होणार?" मी म्हटले "३२०००" त्यांना नवल वाटले. "एवढ्या वयात तुम्ही जमा कशी करता? जपून करत जा." इतक्यात बोरिवली स्टेशन आले. व दोघांनी निरोप घेतला.

☐ मी जुहूला वर्गणीला गेले होते. तेथे महाजन आडनावाचे गृहस्थ होते. त्यांच्या पत्नी दरवर्षी मला पंचवीस रुपये देतात. त्यांच्याकडे गेले पण त्या बाहेर गेल्या होत्या. मुलगी होती. तिने वडिलांना विचारले, " ह्या शांताबाई दरवर्षी आपल्याकडे वर्गणीला येतात आणि आई त्यांना वर्गणी देते. मी देऊ का ? " वडील म्हणाले, " मला नाही माहीत " तेव्हा मी दुसऱ्या घरी गेले. ३-४ दिवसांनी मला त्या बाईंची एक्कावन्न रुपयांची मनीऑर्डर आली. मी त्यांचे कौतुक करून आभार मानले. एक तर खरेपणा दिसून आला व मला खेप पडली म्हणून दुप्पट पैसे पाठवले. त्यांच्या मुलांचे लग्न होते. त्या लग्नाला मी गेले होते. त्यांनी त्यांच्याबरोबर माझा फोटो काढला. अशी एकेकाची आपुलकी !

☐ रत्नागिरीला राहणारा दत्ताराम केतकर हा बोटीवर नोकरीला आहे. मोठा ऑफिसर आहे. तो बोरिवलीला माझ्या घरी आला होता. त्याला म्हटले, " हिंगण्याला भाऊबीज दे. " त्याने अकरा रुपये दिले. जूनमध्ये मी हिंगण्याला आले होते. तीन-चार दिवसांनी घरी गेले. तो त्याचा पाचशे रुपयांचा चेक न मागता आला. हा त्याचा मोठेपणा दिसून आला. त्याची भाची संस्थेत आसऱ्याला आली, ती आता नोकरीला आहे. त्याचे स्मरण ठेवून त्याने ही रक्कम पाठविली.

☐ २२ ऑक्टोबरला रेडिओवर हिंगण्याची माहिती सांगितली, त्यात माझा उल्लेख होता. नानी म्हणून एक शिपाईण संस्थेत आहे. ती आंघोळीला जात होती. शांताबाई हे नाव ऐकताच ती रेडिओपाशी थबकली व संपूर्ण माहिती तिने ऐकली. तिला इतका आनंद झाला की ताबडतोब तिने माझा पत्ता कोणाला तरी विचारून घेतला व मला पत्र पाठविले. तिचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. मी पण तिला ताबडतोब उत्तर पाठविले.

☐ एका माजी विद्यार्थिनीच्या भाच्याकडे मी नेहमी जाते. त्याचप्रमाणे यंदा पण गेले. परंतु दाराला कुलूप होते. येता-जाता मी

पाहात असे. एक दिवशी दार उघडे दिसले. मला पाहून त्यांना आनंद झाला, तो म्हणाला, "मी ही बिल्डिंग विकली. फक्त ही खोली ऑफिस म्हणून ठेवली आहे थोडे दिवस. बरं, आता बोला भाऊबीज किती देऊ ?" मी म्हटले, "आपल्याला देता येईल ती द्या." "तुम्ही म्हणाल ती देतो." "बघा हो !" "बोला." मी म्हटले, "१०१ रुपये." त्यांनी पावती पुस्तक घेऊन १०१ चा आकडा घातला. केवढा हा उदारपणा व माझ्या शब्दाला दिलेला मान ! ते काही तसे फार मोठे नाहीत; पण दानशूर ! मी निघाले तेव्हा म्हणाले, "मावशी पुढल्या वर्षी आमच्या नवीन पत्त्यावर या हं" तो म्हणाला, व मी निरोप घेतला.

□ मी वर्गणीला बदामवाडीत गेले. एका घरी गेले तो अचानक माझी बालमैत्रीण भेटली. ४२ वर्षांनी भेट. एकमेकींचे नाव, गाव, आडनाव, हकीगत विचारली तेव्हा ओळख पटली. खूप बोलणे झाले. त्यात एक जुनी आठवण निघाली. खूप आनंद झाला. मी बालविधवा होते. मैत्रिणीचे वडील माझ्या आजोबांनी भोगता ब्राह्मण म्हणून भट बोलाविला होता. भटजींना वाढायला कोणीच नव्हते. आजीला वाढायचे जमेना. तेव्हा भटजी म्हणाले, "शांतीला सांगा सोवळे नेसून वाढायला." आजोबा म्हणाले "शांती विकेशा आहे. ती वाढायला कशी चालेल ?" ते दशग्रंथी ब्राह्मण म्हणाले, "मला चालेल, शांतीने श्राद्धाचे वाढले तरी." त्यांचा हुकूम आजोबांनी मानून मला वाढायला सांगितले व मी वाढले. ब्राह्मण जेवले. अशा आठवणींची उजळणी झाली. मग ती मुद्द्यावर येऊन म्हणाली. "शांता किती भाऊबीज देऊ ? मी सांगितले, "तुला वाटेल ती दे, मी सांगत नाही." मग तिने आपले दहा रुपये दिले व शेजाऱ्यांना बोलाविले. त्या पाचजणांनी दहा-दहा रुपये दिले. असे एका जागी साठ रुपये झाले. दर वर्षी तेथे साठ रुपये मिळतात.

□ आमच्या सोसायटीत सत्यनारायणाची पूजा झाली. देवापुढे ठेवलेले पैसे व भटजींना द्यावयाची दक्षिणा यावरून वाद झाला.

भटजींनी दक्षिणा तेवढीच घेतली व रागाने निघून गेले. भटजी गेले नी सोसायटीने मला बोलाविले व विचारले, " देवाजवळचे पैसे व शिधा यांचे काय करायचे ते सांगा." मी हिंगण्याची विद्यार्थिनी आहे हे सोसायटीत माहीत आहे. मी म्हटले, " पैसे हिंगण्याच्या संस्थेला देते आणि शिधा हिंगण्याचीच एक अगदी गरीब माजी-विद्यार्थिनी दहिसरला राहते तिला देते." मंडळीना कल्पना पसंत पडली व मी त्याप्रमाणे केले. रोख रकमेची पावती भाऊबीजेला केली व शिधा देऊन व्यवहार पुरा केला.

□ मी एका घरी भाऊबीज मागायला गेले त्याचवेळी बाळाचे बारेसे होते. घरच्या बाई म्हणाल्या, "हा सुयोग म्हटला पाहिजे. आज सकाळीच आम्ही तुमची आठवण काढली होती. कारण तुमच्या आशीर्वादानेच मुलगा झाला असं आम्ही मानतो. त्याचं नाव आम्ही 'आशीर्वाद,' ठेवणार आहोत." त्यांच्या आनंदात मी सामील झाले. मजवर केवढी त्यांची भक्ती ! चहा वगैरे देऊन मला बारा रुपये दिले व त्यांनी माझी बोळवण केली. मीही आशीर्वाद देऊन निघाले.

□ मी माहीमच्या शाळेत शिकवित असताना तिसरीच्या वर्गात परुळेकर म्हणून एक विद्यार्थी माझ्या वर्गात होता. फार हुशार होता. तो पास होऊन गेला व माझीही बदली दुसऱ्या शाळेत झाली. त्यामुळे पुढे बऱ्याच वर्षात भेटच नाही. मला बरे नसल्याने मी एकदा डॉक्टरांकडे गेले. पाटीवर नाव होते पण ते तितकेसे लक्षातही नव्हते नंबराप्रमाणे डॉक्टरांनी मला आत बोलाविले. मला पाहून त्यांनी माझे पाय धरले. मी आश्चर्यचकीत होऊन म्हणाले,"हे काय डॉक्टर?" ते म्हणाले, "बाई, तुम्ही, मला ओळखलं नाही ! मी तुमच्या माहीमच्या शाळेतला विद्यार्थी." हे ऐकून माझा ऊर अभिमानाने भरून आला. मला खूपच आनंद झाला. मी त्याची पाठ थोपटली. कंपौंडर पाहातच राहिला. त्यांनी मला औषध तर फुकटच दिले आणि दहा रुपये भाऊबीजही दिली. मी तोंड भरून आशीर्वाद दिला व आभार मानले.

☐ वसईजवळ वज्रेश्वरी म्हणून देवस्थान आहे. तेथे आम्ही सहलीला गेलो होतो. बऱ्याच बायका आल्या होत्या. काही भक्तिभावाने तर काही मजा म्हणून. परिसर पाहात बोलत जात असताना एका बाईने विचारले,"काहो, शांताबाई परांजपे तुम्हाला माहीत आहे का?" मी मुद्दामच म्हटले, "त्या कुठे राहतात, काय करतात माहीत आहे का?" त्या कर्वे आश्रमात शिकलेल्या आहेत. भाऊबीज मिळविण्यात त्यांचा पहिला नंबर असतो म्हणे. त्यांना पाहण्याची खूप दिवस इच्छा आहे. बाई अगदी साध्या. बोलाने गोड आहेत." तेव्हा मी ओळख दिली, "मीच ती." ते ऐकून अक्षरक्षः त्यांनी माझे पाय धरले व आनंदाश्रू आले. त्या म्हणाल्या, "मला आज मोठा लाभ झाला. त्यांनी दोन रुपये देऊन पावती घेतली." मी म्हटले, यंदा तिसरा लाख पूर्ण होणार त्यात तुम्ही अमोल भर घातलीत. ओळख असू द्या.

☐ "माझे वय आता सत्तरीला आले आहे. तेव्हा आता माझ्या भाऊबीजेला ओहोटी लागण्याची शक्यता आहे. मी हालअपेष्टांत दिवस काढून शिकले. २९ वर्षे नोकरी केली. आता दहा-बारा वर्षे पेन्शन खात आहे. चार धाम यात्रा झाल्या. विमानातून पशुपतीला गेले. हे केवढे माझे भाग्य! अर्थात ह्या सर्वांचे श्रेय गुरुवर्य अण्णांनाच. त्यांनी संस्थेत ठेवून घेतलं म्हणूनच! मला वाटतं पुन्हा लहान होऊन आश्रमात यावं आणि भाऊबीज मिळवावी. मला भाऊबीज मिळविताना माझी बहीण कैलासवासी आऊताई गोडबोले हिची आज खूप आठवण होतेय. मला जे एकंदरीत मानाचे स्थान मिळाले ते संस्थेमुळे. ह्याची मला सतत जाणीव होते आहे व कायमचीच राहील. मी भाऊबीजेच्या कामात मान, अपमान, गण, गोत, सर्व विसरून एकरूप झाले, म्हणून मला हे भाग्य लाभले. गुरुवर्य अण्णा, सौभाग्यवती बाया, पार्वतीबाई आठवले या सर्वांना माझे प्रणाम. त्यांच्यामुळे माझं सोनं झालं. मी माझ्या पोटापुरती मीठभाकरी मिळविली. मला कशाची काळजी नाही. मी आज धन्य झाले." तीन लाख पुरे झाल्याचे, शांताबाई म्हणाल्या.

## पुरवणी–१

इतकी वर्षे काम केले. शरीर-मनाला सवय झाली ती जाणार कशी ? जित्याची खोड. तेव्हा होईल तेवढे काम करीत राहावे असे मी योजले आहे. मारुतीचे शेपूट, वाढतच जाणार. तेव्हा सांगण्यासारखे एक-दोन अनुभव.

☐ दादरला भट नावाच्या एका गृहस्थांकडे मी गेली ३० वर्षें जात आले. आठ आण्यापासून वाढवीत पंचवीस रुपयांपर्यंत भाऊबीज दिली. यंदा त्यांच्या मुलांचे लग्न झाले. ते नेहमीच माझे आदरातिथ्य करतात. मुद्दाम माझा पत्ता घेऊन त्यांनी मला निमंत्रण केले. त्यांच्या आग्रहावरून मी लग्नाला गेले व कार्यक्रम आटोपून घरी गेले. यंदा मी भाऊबीजेच्या कामाला खूपच लवकर सुरुवात केली व ८ एप्रिलला त्यांच्या घरी गेले. त्यांनी नेहमीप्रमाणे पंचवीस रुपये दिले. चहापाणी झाले. इतक्यात बायको हातात एक लुगड्याची घडी घेऊन आली व अत्यंत आग्रहाने मला त्यांनी डोळ्यांत पाणी आणून ती घ्यायला लावली. त्यांच्या स्वागताबद्दल व आदराबद्दल मला अभिमान वाटला. मी भारावून गेले. कोणत्या शब्दांनी त्यांचे आभार मानू असे मला झाले.

☐ दादरमधील सिद्धपुरा बिल्डिंगमध्ये राहाणारे श्रीयुत नाईक हे दरवर्षी नियमाने दहा रुपये भाऊबीज देत असत. पण एका वर्षी त्यांनी जागा सोडल्यामुळे मला भेटले नाहीत. त्यांच्या जागेत राहणाऱ्यांनी माझी हेटाळणीच केली. दोन वर्षांनंतर अचानक त्यांच्या बायकोला माझा पत्ता कळला. त्यांनी मला सविस्तर, सुंदर पत्र लिहून नवीन पत्ता कळविला व कसे यायचे ते तपशीलवार दिले. मी गेल्यावर पतिपत्नींनी स्वागत केले. दोन वर्षे ते माझ्या नावाने हिंगण्याला मनीऑर्डर करीत होते, ते सांगून त्यांनी मला पंचवीस रुपये दिले. एवढेच नव्हे तर शेजारी श्री. पटवर्धन यांच्याकडे नेऊन रु. २१ देवविले. माझ्या कार्याचा गौरव केला. सर्वजण म्हणाले, "तुम्ही आजपासून आमच्या भगिनी झालात. अशीच भाऊबीज दरवर्षी देऊ." अशा सर्वांचे आभार, मी शब्दांनी किती सांगू ?

## पुरवणी – २

□ अलीकडे तीन आकड्यांच्या रकमा तर भाऊबीजेत थोड्या-फार असतातच. पण अचानक जास्तीही येतात. माहीमला चंद्रकांत डेरे यांच्याकडे सप्टेंबरमध्ये गेले. त्यांनी दर वर्षाप्रमाणे रु. २५१ दिले व गणपतीनंतर पुन्हा येण्यास सांगितले. त्यांच्याकडे गौरीगणपतीपुढे जमलेली रक्कम त्यांनी माझ्यापुढे ठेवली. पैसे मोजले ते रु. ९५० भरले. अशा अनुभवामुळे मन भरून येते व कामाला उत्साह वाढतो.

□ माझा पत्ता माहीत नसला की लोक हिंगण्याला पत्रं पाठवितात व तिकडून ती माझ्याकडे येतात. अशाच एका पत्राला उत्तर पाठवून 'तुमच्याकडे कसे यावयाचे ते कळवा' म्हणून लिहिले. त्यांनी नकाशाच काढून पाठविला. मी गेल्याबरोबर त्यांनी मला ओळखले. पतिपत्नींनी आत जाऊन विचारविनिमय केला व विचारले. "चेक चालेल ना? चेकवर नाव काय घालू?" मी सांगितले "संस्थेच्या नावाने क्रॉस चेक द्या." चेकवर हजार रुपयांचा आकडा पाहून मी थक्कच झाले. या ठाकूर पतिपत्नींचे आभार कसे मानावे हेच समजेना. त्यांनी पाच साड्यांही गरीब मुलींकरिता दिल्या. "पुढच्या वर्षीही या. मात्र इतके देऊ असे नाही." ते म्हणाले. मी सांगितले, "पाच रुपये दिलेत तरी चालेल." त्यांनी मला मोटारने स्टेशनवर पोचविले. अशी हिमालया-एवढ्या मोठ्या मनाची माणसेही भेटतात. त्यामुळे वाईट अनुभव पार विसरून जातात.

□ राधेश्याम आग्रवाल यांचे भायखळ्याला दुकान आहे. ते चहा, कॉफी, दूध पावडर वगैरे विकतात. धर्मयुगमधला माझा लेख वाचून त्यांना आनंद झाला. त्यांनी हिंगण्याला पत्र पाठविले. त्यात होते 'मी दर वर्षी भाऊबीज देणार आहे. मला एका नवीन बहीण मिळाली.' मी गेल्यावर त्यांनी माझा आदर-सत्कार करून पंचवीस रुपये दिले. पाव किलो कॉफी मला भेट म्हणून दिली. असा अनोखा भाऊ मिळाल्याचा मला आनंद झाला.

मी नुकतीच बोर्डाचा राजीनामा देऊन मुंबई म्युनिसिपालिटीच्या शाळेत नोकरीस लागले. मला शाळा मिळाली चुनाभट्टी माहीमची. हेडमास्तरांनी वर्ग दिला तो बिगरीतील मुलांचा. वर्गात ५० मुले होती. नवीनच नोकरी असल्याने मला काहीच बोलता आले नाही. मला लहान मुले फार आवडत. माझ्या वर्गात होती ५॥ वर्षांची चित्रा पुरव. परंतु लहान असून समंजस होती. अभ्यास चांगला करायची. त्यामुळे माझी लाडकी होती. पुढे ती पहिलीत गेली. परंतु रोज मला भेटायची. १९५२ साली माझी खेरवाडीला बदली झाली. संबंध तुटला. पुढे ती किती शिकली; लग्न केव्हा झाले ते कळले नाही. आता ती सौ. वसुधा पाटील झाली आणि बँकॉकला गेली. मला तिच्या एक नातेवाईक सौ. जयश्री पाटील हिने सर्व हकीकत सांगून सौ. वसुधाचा पत्ता मला दिला. मी तेथे तिला पत्र पाठविले. ते वाचून तिला अतिशय आनंद झाला. मला तिने सविस्तर पत्रोत्तर पाठविले. त्यात म्हटले होते, "परमपूज्य बाई मी आपल्यासाठी इथे भाऊबीज मिळवीन व आपणाकडे पाठवीन." त्याप्रमाणे तिने १९८९–९० ला १०००/– रु. पाठविले. यंदा तिने १९९२ ला रु. १२५५१/– पाठविले. मी तो आकडा पाहून थक्कच झाले वास्तविक हिंगण्याशी तिचा काहीही संबंध नसूनही तिने आपल्या बाईंकरिता खटपट केली. मला खूप आनंद झाला. बँकॉक येथे २६ जानेवारीला देशोदेशीचे राजदूत आले होते. तेथे 'इंडियन वुमेन' संस्थेतर्फे तिने फुलांच्या रांगोळ्या काढल्या होत्या. त्याचे सर्वांनी कौतुक केले. तिने मला पत्रातून १९९३ साठीही भाऊबीज मिळविण्याचा आपला मनोदय कळविला आहे. योग्य वेळी मी तिला पावतीपुस्तके पाठविणार आहे. अशा माझ्या दोन आदर्श विद्यार्थिनी आहेत, सौ. जयश्री ठाकूर आणि सौ. वसुधा पाटील. त्यांचे कौतुक करावे तितके थोडेच. संस्थेने संक्रांत भेटकार्ड तसेच आभार प्रदर्शनाचे पत्र त्यांना पाठविले होते.

यंदा प्रकृती अस्वास्थ्यामुळे मी घरोघरी भाऊबीज मिळविण्यासाठी जाऊ शकले नाही. परंतु ६००/७०० पत्रे पाठविली. परंतु लोकांनी

चांगला प्रतिसाद दिला. काहींनी चेक, पोस्टल मनीऑर्डरने पैसे पाठविले. तर काहींनी प्रत्यक्ष येऊन भाऊबीज दिली. प्रोफेसर ठाकूर यांनी रु. १०१/– दिले. त्यांची वर्गभगिनी डॉ. जोशी हिचेही रु. १०००/– भाऊबीज म्हणून पाठविले. प्रकृती बरी नसल्याचे कळल्यावर मला भेटायला आले. चहा–गप्पा झाल्यानंतर मी त्यांना म्हटले, "मी गेले तरी माझ्या संस्थेला भाऊबीज देत जा." त्यावर ते म्हणाले, "तुम्ही इतक्यात जात नाही, परंतु गेलात तरी तुमची भाऊबीज म्हणून मी हयात असेपर्यंत संस्थेला रक्कम देत जाईन." केवढा हा मनाचा मोठेपणा! असे बरेच बंधू व भगिनी मजवर विश्वास ठेवून आहेत. मीही त्या सर्वांना आभारपत्रे पाठविते. दुसरे उदाहरण म्हणजे लोकप्रभा साप्ताहिकात माझी मुलाखत वाचून आपल्या मुलीच्या (चि. सुकृता) पहिल्या वाढदिवसानिमित्त प्रा. सुनिल शिंदे यांनी माझ्या नावाचा उल्लेख करून रु. १००/– भाऊबीज पाठविली. त्यांनाही मी आभारपत्र पाठविले. असे अनेक दाते आहेत. माझे अनेक सत्कारही झाले.

(१) १९६९ मध्ये "ब्राह्मण-सभा" तर्फे 'आदर्श समाजकार्य' नाला-सोपारा येथे माननीय श्री. हरिभाऊ वर्तक यांनी सत्कार केला.
(२) नालावासीय नागरिकांतर्फे 'आदर्श समाजसेवा' सत्कार.
(३) १९७३ मध्ये 'हुंडा-विरोधी चळवळ' संस्थेतर्फे 'आदर्श समाजसेवा' सत्कार.
(४) १९७४ मध्ये 'जागृत महिला मंडळा' तर्फे सत्कार.
(५) 'महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळा'तर्फे १९७५ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त 'उल्लेखनीय कार्य व समाजसेवा' याबद्दल 'महिला गौरव.'
(६) १९८१ मध्ये रोटरी क्लब तर्फे 'उल्लेखनीय समाजसेवा' पुरस्कार.
(७) 'बळवंत सोसायटी, बोरिवली' तर्फे १९८१ मध्ये 'आदर्श समाजसेवा' सत्कार.
(८) मातुःश्री माईसाहेब पारखे मेमोरियल ट्रस्ट तर्फे 'आदर्श महिला' सत्कार–१९८२.

(९) 'अस्वस्थ मित्र-मंडळ, डोंबिवली' तर्फे १९८२ मध्ये 'आदर्श समाजसेवा' सत्कार.

(१०) 'साहित्य-प्रेमी' तर्फे १९८२ मध्ये अध्यक्ष माधव मनोहर यांच्या हस्ते सत्कार.

(११) १९८३ मध्ये 'आदर्श समाजसेवा' परांजपे सोसायटी वासियांतर्फे सत्कार.

(१२) १९८४ मध्ये 'मुलगी झाली हो' या संघटनेतर्फे 'उल्लेखनीय समाजसेवा' सत्कार.

(१३) शिवसेना शाखा क्रमांक १०२ तर्फे वामनराव महाडिक यांच्या अध्यक्षतेखाली १९८६ मध्ये 'आदर्श समाजसेवा' सत्कार.

(१४) १९८७ मध्ये 'बायांनो कुंकू लावा' या संघटनेतर्फे 'उल्लेखनीय समाजकार्य' सत्कार.

(१५) 'सारस्वत बंधूभगिनी' गोरेगांव यांनी अ. ल. रांगणेकर यांच्या हस्ते १९८८ मध्ये सत्कार.

(१६) ५-४-९२ रोजी 'ज्ञानविकास महिला समाजा' तर्फे 'आदर्श समाजकार्य' सत्कार.

अनेक मानपत्रेही मला मिळाली. अर्थातच हे सर्व मान-सन्मान, आदर-सत्कार तसेच लोकसंग्रहही मला संस्थेमुळेच लाभले. संस्थेचे उपकार या जन्मी तरी मी फेडू शकणार नाही.

२० डिसेंबरला सालाबादप्रमाणे मी थैली अर्पण केली. त्यावेळच्या भाषणात मी यावर्षी १ लाख रुपये जमवावेत अशी माझी इच्छा होती. तथापि ९०,०००/– रुपयेच जमले, असे म्हटले. त्याच समारंभाला माननीय अरुण किर्लोस्कर आले होते. त्यांनी माझा हेतू ओळखला व मला जवळ बोलावून म्हटले, "शांताबाई मी आपली इच्छा पूर्ण करतो." दुसऱ्या दिवशी रु. ५०,००१/–चा चेक कमिन्सकडून पाठविला व सोबतच्या पत्रात लिहिले की मला तुमच्या हातची भाऊबीजेची पावती द्या. देणगीची पावती नको. केवढा हा माझ्याबद्दलचा आदर!

त्यांनाही मी आभारपत्र पाठविले. अशी मंडळी संस्थेला लाभल्यावर संस्थेला काय कमी पडणार !

मी गेली ४० वर्षे कर्नाटक सोसायटीत जाते. सर्व लोक चांगले असून भाऊबीजही बरी देत असत. त्यात माझी मैत्रीण हेबळे ही देखील चांगली भाऊबीज देत असे. पुढे तिचे यजमान श्री. हेबळे हे वारले. हे मला कळले नाही. कारण त्यांच्या घरचे कोणीच भेटले नाही. परंतु नंतर एक दिवस अचानक त्या आपल्या मानलेल्या मुलाला घेऊन माझ्या घरी बोरिवलीला आल्या. त्या मला म्हणाल्या, "शांताबाई, मी संस्थेला एक लाखाची देणगी देणार आहे. तसेच माझी नणंद वारली तिच्या स्मरणार्थ मी संस्थेला २५ हजारांची कायम ठेव देणार आहे. संस्थेने दरवर्षी त्याच्या व्याजातून माझ्या नणंदेच्या नावाची भाऊबीज घ्यावी." त्यांनी म्हटल्याप्रमाणे लगेच केलेही. अशी अनेक उदार माणसे मला भेटली.

मी बोरिवलीला गोविंदनगरमध्ये बळवंत सोसायटीत राहाते. सोसायटीतही मी भाऊबीज गोळा करते. सर्व लोक ऐपतीप्रमाणे, आदराने भाऊबीज देतात. यंदा श्री. गोविंदनगर सांस्कृतिक कार्यक्रम समितीच्या हनुमान मंदिराकडून मला भाऊबीजेदाखल रु. २५१/- दिले. हा उपक्रम मला स्तुत्य वाटला. दुसऱ्या एका भजनीमंडळाचे श्री. घाणेकर यांनीही मंडळाच्या वतीने भाऊबीजेची रक्कम दिली. हे मंडळ दरवर्षी वेगवेगळ्या संस्थांना अशी मदत ऐपतीप्रमाणें करते.

आमच्या सोसायटीत मला भाऊबीज गोळा करण्यासाठी सौ. प्रभुघाटे, सौ. रानडे, सौ. पुष्पा खटाव, श्रीयुत केतकर ही मंडळी आपआपले व्याप सांभाळून मदत करतात. थेंबे थेंबे तळे साचे या न्यायाने माझ्या भाऊबीजेत तेवढीच भर पडते. परंतु एक खट गृहस्थही भेटले. मी त्यांच्यांकडे भाऊबीज मागण्यास गेले असता त्यांनी मला शिव्या देऊन म्हटले, मी आज बरीच वर्षे मुंबईत राहातो. परंतु कर्व्यांचे नाव कधीच ऐकले नाही. मी भाऊबीज वगैरे काही देणार नाही. चालत्या व्हा. तेव्हापासून मी ते घर वर्ज्य केले.

भाऊबीज गोळा करण्याचा उपक्रम वर्षानुवर्षे चालू ठेवल्यामुळे अनेक ओळखी झाल्या, कोणाकडे लग्नाला, तर कोणाकडे मुंजीला, कोणाकडे बारशाला तर कोणाकडे वाढदिवसाला बोलावतात. मीही जाते. ऐपतीनुसार काही देते. बायका म्हणतात " अहो शांताबाई तुम्ही काही द्यायचे नाही. फक्त गोड आशीर्वाद द्यायचा."

एकदा एका घरी भाऊबीजेसाठी गेले होते. त्या घरच्या बाईला मूल होत नव्हते. त्यांचे दुःख पाहून मी त्यांना म्हणाले, " पुढच्या वर्षी पाळणा हलू दे " कर्मधर्मसंयोगाने त्या बाईंना मुलगा झाला. दुसऱ्या वर्षी भाऊबीजेसाठी गेले तेव्हा त्या बाई अगदी आनंदल्या. मला म्हणाल्या, " तुमचा आशीर्वाद खरा झाला. म्हणून बाळाचे नांव आशीर्वाद ठेवले " त्यांनी मुलाला प्रेमाने माझ्या मांडीवर दिले व बाळाची भाऊबीज देऊन दरवर्षी आवर्जून यायलाही सांगितले.

आणखी एक अशीच अविस्मरणीय घटना. ५० वर्षांपूर्वी मी एका श्रीमंत गृहस्थाकडे भाऊबीज मागण्यास गेले. दारावरची बेल वाजवली. त्यांनी दार उघडले. मी संस्थेविषयी माहिती सांगून भाऊबीज देण्यासाठी त्यांना विनंती केली. त्यावेळी मी लबाड आहे असे वाटून त्यांनी गावदेवी पोलिसठाण्यावर फोन केला. मला बसवून बोलण्यात गुंतविली. इतक्यात जवळच्याच पोलिसठाण्यावरील पोलिस आले आणि मला पोलिसठाण्यावर घेऊन गेले. पण त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना योग्य उत्तरे दिली. तेव्हा माझ्या खरेपणाविषयी त्यांची खात्री पटल्यावर त्यांनी माझी क्षमा मागितली व आपल्या गाडीने मला ग्रँटरोड रेल्वे स्टेशनवर पोचविले. यंदा मी महाराष्ट्र बँकेतील संस्थेच्या खात्यात भाऊबीजेचे पैसे जमा करण्यासाठी ५ डिसेंबरला गेले होते. बँकेतील काम झाल्यावर मी रिक्षासाठी रस्त्यावर उभी होते. माझ्या बाजूलाच एक गृहस्थ उभे होते. ते माझ्याकडे एकसारखे पाहात होते. शेवटी न राहवून त्यांनी मला माझे नाव, पत्ता विचारला व आपण परांजपेबाई आहात का ? असेही विचारले. मी म्हटले, " मी शांताबाई परांजपे, बँकेत कामासाठी आले होते आपणास ओळखपत्र पाहावयाचे आहे काय ? " तेव्हा एकदम त्यांना सर्व काही आठवले. मला पकडून पोलिसठाण्यावर घेऊन गेलेला पोलिस तोच होता. आता रिटायर झाल्यानंतरही त्यांना

तो प्रसंग आठवत होता. ते मला म्हणाले, "बाई मला क्षमा करा. राग मानू नका आपल्या कार्यात करण्यासारखी मदत मला जमेल तशी मी नक्की करीन." मी म्हटले, "आनंद आहे. संस्थेला अवश्य मदत करा. आपणास पुण्य लागेल."

आमच्या बोरिवलीत बेडेकरांचे एक दुकान आहे. तेथे सुर्वे आडनावाचा एक हुशार, गोड बोलणार, खूप शिकलेला परंतु अगदी साधा तरुण काम पाहातो. तो भाऊबीजेची ४/५ पुस्तके खपवतो. लोकांना माझी माहिती सांगतो आणि संस्थेसाठी मदत देण्याचे आवाहन देखील करतो. मला 'मदर टेरेसा' म्हणतो. कुठे मदर टेरेसांचे अमोल कार्य आणि कुठे मी ? हा सुर्वे आपले रु. १०१/- भाऊबीज देतो. पण पावती-पुस्तकावर आपले नाव–पत्ता न लिहिता नुसतेच हरी ॐ लिहितो. स्वतःच्या नावाचा–मोठेपणाचा अजिबात हव्यास नसलेला हा निगर्वी युवक आहे. त्याच्या परिचयाच्या एक सौ. राणेबाई माझ्याकडे आल्या होत्या. त्यांनी आपली रु. १००१/- ची भाऊबीज आणि संस्थेतील मुलींकरिता कपडेही दिले.

मला आपणहून मदत करणारी खूप माणसे आहेत. अण्णांच्या आशीर्वादानेच त्यांची माझी भेट घडून दृढ संबंध निर्माण झाले आहेत, असे मला वाटते.

गोरेगांवला राहणारी कु. स्मिता शेटे ही माझी मानसकन्या. ही मला खूप मदत करते. मधूनमधून मला भेटण्यास येते. मला धीर देते. बँकेतील व्यवहार करण्यास मदत करते. समजावून सांगते.

तसेच आमच्या इमारतीत राहणारे श्री. पंडित हे देखील पत्रे पोस्टात टाकणे, पोस्टाची तिकिटे आणून देणे, माझ्या वतीने भाऊबीज दात्यांना, देणगीदारांना फोन करणे इत्यादी हरप्रकारे स्वखुशीने मला मदत करतात. अशा लोकोपयोगी माणसांना देव दीर्घायुरारोग्य देवो आणि त्यांच्यातील माणुसकी सतत जागती राहो असे मला वाटते.

शांताबाई परांजपे

# संस्थेची वैशिष्ट्ये

## (१) शाळा/महाविद्यालय/वसतिगृह प्रवेश :–

- इ. ५ वी पासून महाविद्यालयापर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना वसतिगृहात प्रवेश दिला जातो. शालेय विद्यार्थिनींना प्रवेशासाठी एप्रिलच्या चौथ्या आठवड्यात अथवा २ मे ते १० मे कालावधित "मुख्याध्यापक, महिलाश्रम हायस्कूल, कर्वेनगर, पुणे–५२" या ठिकाणी संपर्क साधावा. शाळेत प्रवेश मिळाल्यास वसतिगृहातील प्रवेश हा परिस्थिती व मुलीची प्रगती यावर अवलंबून असतो.
- कनिष्ठ महाविद्यालय ( ११ वी व १२ वी ) व वरिष्ठ महाविद्यालय यामध्ये प्रवेश घ्यावयाचा असल्यास १० वी/१२ वी च्या निकालानंतर प्राचार्यांशी संपर्क साधावा.
- डी. एड्. कॉलेजसाठी १० वीच्या निकालानंतर जिल्हा परिषदेमार्फत प्रवेश दिले जातात.
- सुमारे ५०० विद्यार्थिनी आर्थिकदृष्टया संस्थेवर पूर्णत: अगर अंशत: अवलंबून आहेत.
- सरकारी अनुदान, खाजगी देणग्या व भाऊबीज निधी अशा मिळणाऱ्या मदतीने लोकाश्रयावर स्त्री-शिक्षणाचा ध्यास घेणारी भारतातील ही आद्य संस्था असून सुमारे १००० विद्यार्थिनींसाठी राहण्याची सोय असलेले महाराष्ट्रातील एकमेव वसतिगृह.

## (२) पाहुणे योजना :–

- पाहुण्यांना राहण्यासाठी " प्रमुख, महिलाश्रम वसतिगृह, कर्वेनगर, पुणे ५२ " यांचेकडून खालीलप्रमाणे योजना राबविली जाते. मे महिन्यामध्ये वसतिगृहातील मुलींच्या राहण्याच्या खोल्या पाहुण्यांना राहण्यासाठी दिल्या जातात, त्यासाठी वरील पत्त्यावर दि. १ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारीपर्यंत फॉर्मसाठी पैसे स्वीकारले जातात व १५ मार्चनंतर फॉर्म भरून पाठवावयाचे असतात. त्यासंबंधीचे माहितीपत्रक सोबत जोडलेले असतेच.

**(३) तांत्रिक स्त्री-शिक्षण योजना :-**

- केवळ विद्यार्थिनींकरिता जुलै ९१ पासून देशातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले असून त्यामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. त्यासाठी पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

**हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेचे**
**कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग फॉर वुमेन,**
**कर्वेनगर, पुणे-४११ ०५२.**

## संस्थेसाठी आपण असे करू शकता :

- कुटुंबातील व्यक्तीच्या वाढदिवसाची भेट, व्रतांचे उद्यापन, दिवंगत व्यक्तीच्या स्मरणार्थ मुलींना भोजन, भेट वस्तू देणे, औषधपाणी, गणवेश, वह्या-पुस्तके व फी इत्यादींसाठी मदत.
- एका विद्यार्थिनीचा वर्षाचा शिक्षण खर्च - रु. ३०००/-.
- संस्थेच्या अहवालासाठी दरवर्षी जाहिरात मिळवून देणे.
- ज्यांना भाऊबीज स्वयंसेवक व्हावयाचे असेल त्यांनी "कार्याध्यक्षा, भाऊबीज भेट मंडळ" यांच्याकडे संपर्क साधावा.
- संस्थेची शताब्दी १४ जून १९९६ ला आहे. तरी संस्थेच्या माजी विद्यार्थिनींनी स्वतःचे पूर्वीचे नांव/पत्ता आणि सध्याचे नाव/पत्ता संस्थेच्या प्रधान कार्यालयाकडे कळवावा.

रजिस्ट्रेशन :-

१८३० च्या सोसायटीज् रजिस्टेशन ॲक्ट अन्वये दि. ८ ऑक्टो, १८९८.
१९५० च्या बॉम्बे पब्लिक ट्रस्टस् ॲक्ट अन्वये (नोंदणी क्र, एफ्-५१) दि, ४ नोव्हें. १९५२.

---

इन्कमटॅक्स ॲक्ट १९६१ कलम ८०-जी खाली
संस्थेस दिलेल्या देणगीच्या रकमेवर सूट मिळते.

# थेंबे थेंबे तळे साचे !

**याप्रमाणे दर वर्षी जमा होणारी भाऊबीज म्हणजे हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेच्या चालू खर्चाला मोठा आधार आहे. या भाऊबीजेचा विनियोग खालील कामाकडे होतो :**

- परिस्थितीने गरीब पण हुशार अशा विधवा, परित्यक्ता, कुमारिका, गरजू विद्यार्थिनींना प्रवेश देऊन त्यांचा पूर्ण अगर अंशतः खर्च संस्था करते. अशा १५० ते २०० विद्यार्थिनी दर वर्षी संस्थेत शिकत असतात

- संस्थेमध्ये सुमारे १४० हरिजन विद्यार्थिनी शिक्षण घेत असतात. त्यांच्याकरिता शासनाकडून अनुदान मिळत असले तरी संस्थेला काही बोजा उचलावा लागतो.

- ज्युव्हेनाईल कोर्टाकडून आलेल्या सुमारे २०० विद्यार्थिनी संस्थेत शिकत असतात. त्यांच्याकरिताही अनुदानापेक्षा जास्त येणारा खर्च संस्थेला करावा लागतो.

**अशा प्रकारच्या सर्व खर्चाला भाऊबीजेची मदत होते.**